श्री लक्ष्मी मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि.,अ.नगर
मुख्य कार्यालय : अकोलकर हॉस्पीटल जवळ, बुरुडगांव रोड, अ.नगर फोन : (०२४१) ३५८६६५९
शाखा : बंधन बँकेशेजारी, नेप्ती रोड, केडगांव (देवी), अ.नगर. मो. ७४९९२३५९७५
ठेवीचे व्याजदर
* ४६ ते ९० दिवस ........ ८%
* ९१ ते ३६५ दिवस ........ ९%
* १ वर्ष व त्यापुढे ........ १०%
* शुभलक्ष्मी दाम दुप्पट ठेव योजना ..... ८४ महिने
* धनलक्ष्मी दैनंदिन बचत ठेव ...... ५ महिने मुदत
अमृत मासिक ठेव १.१५ लाखास १००० रु. दरमहा व्याज
कन्या लक्ष्मी १ लाखास ५ लाख रु.... १८ व्या वर्षी प्राप्त
दैनिक बचत (डेली कलेक्शन) / रिकरिंग (आर.डी.)/मुदत ठेव (एफ.डी.) साठी कमिशन एजंट नेमणे आहेत.
संस्थापक - श्री. अनिल मोहिते | अध्यक्ष - श्री. अजय मोहिते

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

स्पेशल OFFER
STOCK CLEARANCE
ONLY ON SELECTED RANGE
20 - 50 % DISCOUNT
जरीवाला
कापड बाजार, अहमदनगर
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १०.०२.२०२५ | अंक नं. २८८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# पोलिस असल्याची बतावणी करून लुटणारी टोळी अहिल्यानगर शहरासह परिसरात झाली 'सक्रीय'

## आनंदधाम पाठोपाठ पाईपलाईन रोडवरही वृद्धाची सोन्याची चेन व अंगठी पळविली

नगर - पोलिस असल्याची बतावणी करून लुटणारी टोळी नगर शहर आणि उपनगरी भागात सक्रीय झाली आहे. २ दिवसांपूर्वी आनंदधाम रस्त्यावर उद्योजकाला लुटल्याची तसेच नवीन टिळक रोडवर मोपेडवर चाललेल्या महिलेचे गंठण हिसका मारून तोडून नेल्याच्या घटना ताज्या असताना, ९ फेब्रुवारीला सायंकाळी ५.४० च्या सुमारास पाईपलाईन रोडवरही रस्त्याने वॉकिंग करत असलेल्या वृद्धाला अडवून त्याच्या गळ्यातील सोन्याची चेन व हाताच्या बोटातील अंगठी बळजबरीने काढून नेल्याची घटना घडली आहे.

याबाबत दिपक त्र्यंबक आंबेकर (वय ६७, रा. श्रीकृष्णनगर, हॉटेल सागर समोर, पाईपलाईन रोड, अ.नगर) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी आंबेकर हे ९ फेब्रुवारीला सायंकाळी नेहमीप्रमाणे वॉकिंग करता गेले होते. पाईपलाईन रोडवर असलेल्या सुर्यकांत फर्निचर दुकाना जवळ त्यांना दोन अनोळखी इसम मोटारसायकलवर रस्त्याच्या कडेला उभे असलेले दिसले. ते तसेच पुढे गेले असता थोड्याच अंतरावर आणखीन एका मोटार सायकलवर दोन अनोळखी रस्त्याच्या कडेला बसलेले दिसले. त्यातील एकाने आंबेकर यांना थांबून एक कार्ड दाखवून मी पोलीस आहे. तुमच्या गळ्यातील चेन व अंगठी काढून द्या असे म्हटले.

त्यावर आंबेकर यांनी तुम्ही पोलीस आहात तर माझ्या गळ्यातील सोने का मागता असे म्हटले असता त्यातील एकाने त्यांच्या पाठीमागून हाताने धक्का दिला. त्यामुळे गोंधळून आंबेकर यांनी त्यांच्या गळ्यातील ३ तोळे वजनाची सोन्याची चेन व हाताच्या बोटातील ६ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी असा ऐवज काढून दिला. त्यानंतर लगेचच ते चारही अनोळखी इसम त्यांच्याकडील दोन मोटार सायकलवरुन श्रीराम चौकाच्या दिशेने भरधाव वेगात निघून गेले. काही वेळातच आपण लुटलो गेलो असल्याचे आंबेकर यांच्या लक्षात आले. त्यांनी आरडाओरडा केला. मात्र नागरिक जमा होईपर्यंत ते चौघेही पसार झाले होते. त्यानंतर दिपक आंबेकर यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन पोलिसांनी चार अनोळखी इसमाविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २०४, ३१८ (४) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक राजपूत करीत आहे.

## शहर परिसरात ४ दिवसांत घडल्या लुटीच्या ३ घटना

शहरातील नवीन टिळक रोडवर ६ फेब्रुवारीला सायंकाळी ७.३० च्या सुमारास मोपेड वरून घरी चाललेल्या सौ.मिनाबाई बाळासाहेब शिरसाठ (वय- ४०, रा. इधाते शाळेजवळ, भगवानबाबा नगर, सारसनगर) यांना धक्का देवून त्यांच्या गळ्यातील २ तोळे वजनाचे १ लाख २९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठण मोटारसायकल वर आलेल्या दोघांनी बळजबरीने हिसकावून नेले होते. त्या पाठोपाठ एमआयडीसी मधील उद्योजक राजाराम राय (वय ६२) यांना ७ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास आनंदधाम रस्त्यावर मोटारसायकलवर आलेल्या दोघांनी अडवून पोलिस असल्याची बतावणी करून तुम्ही हेल्मेट का नाही घातले? तुमचा वाहन चालविण्याचा परवाना दाखवा असे दटावले. त्यानंतर तुम्हाला कळत नाही का, या भागात किती चेन स्नॅचिंग च्या घटना घडत आहेत. तरीही तुम्ही गळ्यात सोन्याची चेन, हातात अंगठ्या घालून फिरता. कालच या परिसरात चेन स्नॅचिंग झाली आहे. त्यामुळे तुम्ही गळ्यातील चेन आणि अंगठ्या काढून ठेवा असे म्हणत त्यांना त्या काढायला लावल्या आणि त्यांची नजर चुकवून ते दागिने लंपास करण्याच्या घटना घडल्या होत्या. त्यानंतर पुन्हा पाईपलाईन रोडवर ९ फेब्रुवारीला अशीच घटना घडली आहे.

## सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा उपयोग होईना; चोरट्यांनी पोलिसांनाच दिले आव्हान

पोलिस असल्याची बतावणी करत लुटमार करणाऱ्या या टोळीने ४ दिवसांत ३ ठिकाणी आणि ते ही अतिशय वर्दळीच्या रस्त्यावर लुटमार करत शहर पोलिसांनाच आव्हान दिले आहे. पोलिस दलाने शहरासह उपनगरात मुख्य चौक तसेच वर्दळीच्या रस्त्यांवर ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविलेले आहेत. या शिवाय नागरिक, व्यापारी यांचेही खाजगी सीसीटीव्ही कॅमेरे ठिकठिकाणी आहेत. असे असतानाही गेल्या ४ -५ दिवसांत पोलिसांना या टोळीचा काहीही तपास लागलेला नाही. त्यामुळे हे सीसीटीव्ही कॅमेरे शोभेच्या वस्तू ठरताहेत काय? किंवा पोलिसांनी या घटना गांभीर्याने घेतलेल्या नाहीत. अशी शंका उपस्थित होत आहे. दिवसा ढवळ्या, मोठ्या वर्दळीच्या ठिकाणी जर अशा लुटमारीच्या घटना वारंवार होत असतील तर पोलिसांचा गुन्हेगारांवर काही वचकच राहिलेला नाही असे दिसत आहे. त्यामुळे आता जिल्हा पोलिस अधिक्षक राकेश ओला यांनीच याचा जाब शहरातील पोलिस यंत्रणेला विचारण्याची गरज आहे.

# आमच्या प्रकरणांत पडू नका, अन्यथा तुला जीवे मारुन टाकू

## भूखंडावरील अतिक्रमण उघडकीस आणणाऱ्यास धमकी

नगर - शहरातील एका भूखंडावरील अतिक्रमण उघडकीस आणणाऱ्याला फोन करून आमच्या प्रकरणांत पडू नका, अन्यथा जीवे मारुन टाकू अशी धमकी देण्याची घटना ८ फेब्रुवारीला घडली आहे. या प्रकरणी फोन करणाऱ्या व्यक्ती विरोधात तोफखाना पोलीस स्टेशनला अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील घनःश्याम बोडखे यांना ही धमकी देण्यात आली आहे. घनःश्याम बोडखे यांनी लालटाकी परिसरातील एका भूखंडावरील अतिक्रमण करुन बळकावल्याचा प्रकार उघडकीस आणला असल्याने फोन वरुन धमकी देण्याचा प्रकार घडला असल्याचा दावा केला आहे.

तरी सदर प्रकरणाचा आणि त्या व्यक्तिचा परस्परांशी काही संबंध आहे का? याची चौकशी करण्याची मागणी बोडखे यांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

# अभिनेता राहुल सोलापूरकर यांच्या वक्तव्याचा नगरमध्ये निषेध

नगर - अभिनेता राहुल सोलापूरकर याने छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल चुकीचे विधान केल्यामुळे आंबेडकरी समाजाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर निषेध व्यक्त करून निदर्शने करण्यात आली.



अभिनेता राहुल सोलापूरकर यांच्या वक्तव्याचा आंबेडकरी समाजाच्यावतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर निदर्शने करण्यात आली.

यावेळी सामाजिक न्याय विभागाचे सुरेश बनसोडे, अजय साळवे, सुमेध गायकवाड, ज्येष्ठ नेते संभाजीराव भिंगारदिवे, किरण दाभाडे, विजय गव्हाळे, प्रा. डी.आर. जाधव, ॲड. संदीप पाखरे, विलास साठे, गौतमीताई भिंगारदिवे, संजय जगताप, संजय साळवे, सिद्धार्थ आढाव, कदम सर, अंकुश मोहिते, वैभव कांबळे, कौशल गायकवाड, निखिल साळवे, पोपट जाधव, अशोक खंडागळे, विशाल भिंगारदिवे, सतीश साळवे, बंटी शिरसाठ, सुजन भिंगारदिवे, गणेश गायकवाड आदीसह समाजबांधव उपस्थित होते.

यावेळी सुरेश बनसोडे म्हणाले की, अभिनेता सोलापूरकर यांनी कुठल्याही प्रकारचे महापुरुषांच्या संदर्भात अभ्यास केलेला नाही, त्यामुळे या व्यक्तीचा जाहीर निषेध करून यापुढे जर महापुरुषांबद्दल अपशब्द व्यक्त केले तर तुडवल्याशिवाय आंबेडकरी जनता शांत बसणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

# शाळकरी मुले व नागरिकांवर हल्ले करणारे माकड अखेर जेरबंद

नगर - गेल्या काही दिवसांपासून नगर तालुक्यातील पिंपळगाव वाघा गावात नागरिक तसेच शाळकरी मुलांवर हल्ला करणाऱ्या माकडाला जेरबंद करण्यात अखेर वनविभागाच्या पथकाला यश आले. या माकडाला सुरक्षित अधिवासात सोडल्याने स्थानिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. सोमवारी १० फेब्रुवारीला सकाळी हे रेस्क्यू ऑपरेशन राबविण्यात आले.

पिंपळगाव वाघा गावात गेल्या काही दिवसांपासून एक माकड धुमाकूळ घालत होते. सदर माकड जिल्हा परिषद शाळेच्या परिसरातच वावरत होते. त्यामुळे अनेक शाळकरी मुलांवर तसेच परिसरातून ये जा करणाऱ्या नागरिकांवर त्याने हल्ले केले होते. माकडाच्या या हल्ल्यात जखमी झालेल्या नागरिकांची संख्या दिवसागणिक वाढत चालल्याने त्याला जेरबंद करण्याची आग्रही मागणी नागरिकांनी केली होती. गावच्या सरपंचांनी देखील २ दिवसांपूर्वी वन विभागाला पत्र देवून या हल्लेखोर माकडाचा बंदोबस्त करण्याची मागणी केली होती.

### वनविभागाच्या टीमने राबविले रेस्क्यू ऑपरेशन, माकडाला सुरक्षित अधिवासात सोडले



नगर तालुक्यातील पिंपळगाव वाघा गावात नागरिक तसेच शाळकरी मुलांवर हल्ला करणाऱ्या माकडाला जेरबंद केल्यानंतर वनविभागाचे पथक व ग्रामस्थ.

त्यामुळे १० फेब्रुवारीला सकाळीच वन परिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक अशोक गाडेकर, चालक संदीप ठोंबरे, वन कर्मचारी सखाराम येणारे, तेजस झिने, सुभाष हंडोरे, वन्यजीव अभ्यासक हर्षद कटारिया, सचिन क्षीरसागर यांच्या पथकाने गावात दाखल होत ग्रामस्थांच्या मदतीने रेस्क्यू ऑपरेशन सुरु केले. बराच वेळ त्या माकडाला पकडण्याचा प्रयत्न केल्यानंतर अखेर त्याला भूलीचे इंजेक्शन देऊन पकडण्यात रेस्क्यू टिमला यश आले. या पथकाने माकडाला पिंजऱ्यात बंदिस्त करून सुरक्षित अधिवासात सोडल्याने स्थानिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

## कुत्र्याच्या पिलाचा माकडाला लागला होता लळा

गावच्या परिसरात धुमाकूळ घालणाऱ्या या माकडाला गावातील एका कुत्र्याच्या पिलाचा चांगलाच लळा लागला होता. ते माकड या पिलाजवळ कोणालाही येवू देत नव्हते, कुणी कुत्र्याच्या पिलाला खायला टाकायला जरी त्याच्याजवळ गेले की माकड त्या व्यक्तीवर हल्ला करायचे. तसेच त्या पिलाला आपल्यासोबत उचलून न्यायचे. घराच्या गच्चीवरही ते माकड कुत्र्याच्या पिलाला घेवून जात होते. अखेर रेस्क्यू टिमने या कुत्र्याच्या पिलाचा आधार घेत माकडाला जेरबंद केले. त्या पिलाला बिस्कीट खायला टाकायच्या निमित्ताने जवळ बोलावले, त्याच्या पाठोपाठ माकडही टप्प्यात आले आणि रेस्क्यू टिमने त्याला भुलीचे इंजेक्शन देऊन पकडले.

## आगडगावला ही नागरिकांना चावा घेणारे माकड पकडले

नगर तालुक्यातील आगडगाव येथेही एका माकडाने मागील आठवड्यात चांगलाच उच्छाद मांडला होता. गावातील अनेक नागरिकांवर त्याने हल्ला करत चावा घेतला होता. या माकडाला पकडण्यासाठी वनरक्षक विजय चेमटे, मनीष जाधव यांच्यासह इतर वनकर्मचारी आणि वन्यजीव अभ्यासक हर्षद कटारिया, सचिन क्षीरसागर यांच्या पथकाने ग्रामस्थांच्या मदतीने रेस्क्यू ऑपरेशन राबवून त्याला जेरबंद केले होते.

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

महेंद्र पेडावाला
रजवाडी गुजराती थाळी
पार्सल सुविधा उपलब्ध..
किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय..
कापड बाजार, अहिल्यानगर.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## गिनीज बुक रेकॉर्ड करणारे रहस्यकथा सम्राट

आजच्या पिढीला OTT किंवा अन्य माध्यमातून रहस्यकथा पाहायला मिळतात पण विचार करा ५०–६० ची दशके. तेव्हा ना फारसा टीव्ही होता ना आजच्या सवलती, माध्यमे. अशा काळात रसिक वाचक पुस्तके वाचीत. रहस्यकथा, शृंगारकथा, ऐतिहासिक व अन्य कथा, कादंबऱ्या वाचल्या जातात.

रहस्यकथा सम्राट म्हणून स्व.श्री. बाबूराव अर्नाळकर यांचं नाव जुन्या जाणत्या रसिक वाचकांना नक्कीत माहीत आहे. खुद्द लता मंगेशकर यांना एकदा विचारले गेले होते की, इतर वेळेत किंवा योग्य वेळ घालवण्यास तुम्ही काय करता तर त्या उत्तरल्या होत्या, ''मी बाबूरावांच्या रहस्यकथा वाचण्यात गुंगून जाते.''

स्व. बाबूरावांनी तब्बल १२०० रहस्यकथा लिहिल्या. याची 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली तेव्हा त्यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, 'खरे तर हा




गौरव मराठी वाचकांचा आहे. कारण त्यांनी एकाच लेखकाने लिहिलेली पुस्तके वर्षानुवर्षे आवडीने वाचली.'



त्यांनी पाश्चात्य कथांची शिदोरी वापरली हे खरे असले तरी त्यांना भारतीय पेहराव चढवण्यास त्यांनी मोठे श्रम घेतलेत. आचार्य अत्रे म्हणतात, ''ज्यांचे लेखन जास्तीत जास्त वाचले जातात तोच खरा लोकप्रिय लेखक.'' तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी बाबूरावांना राज्य सरकारतर्फे त्याकाळी १००००/– रुपयांचे बक्षीस दिले होते.

चार घटका निर्भेळ करमणूक एवढाच रहस्यकथेचा दावा आहे पण धकाधुकीच्या जीवनात मन आनंदासाठी यांचीही गरज आहे व असेल.

# चौका चौकात गुन्हेगारांच्या टोळ्या, हप्ते वसुली, महिला मुलींची छेडखानी, बिंगो, मटक्याचे अड्डे, वेश्याव्यवसाय सुरू आहे, पोलीस करताय तरी काय?

### वाढलेल्या गुन्हेगारीमुळे शहरासह उपनगर परिसराचा बिहार झाला; गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना तडीपार करा रात्रीची गस्त वाढवा; टोळ्यांचा बंदोबस्त करा अन्यथा तीव्र आंदोलन

नगर – शहरातील सर्वाधिक वेगाने विकसित होणारा बोल्हेगाव–नागापूर परिसरातील वाढलेल्या गुन्हेगारीमुळे या परिसराचा बिहार झाला असून या भागातील गुन्हेगारी पोलिसांनी तातडीने मोडून काढावी अन्यथा रस्त्यावर उतरून नागरिकांसह तीव्र आंदोलन उभे केले जाईल असा इशारा माजी नगरसेवक दत्ता पाटील सप्रे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये सांगितले.

पत्रकार परिषदेमध्ये पुढे म्हटले आहे की, बोल्हेगाव–नागापूर भागातील वाढलेल्या गुन्हेगारीबाबत संताप व्यक्त करत पोलिसांच्या अर्थपूर्ण निष्क्रिय भूमिकेवर जोरदार टीकास्त्र केले. बोल्हेगाव–नागापूर एमआयडीसी भागात सध्या चौका–चौकात गुन्हेगारांच्या टोळ्या तयार झाल्या आहेत. या टोळ्या हप्ते वसुली, महिला मुलींची छेडखानी, बिंगो मटक्याचे अड्डे चालवित असून या भागातील महिला, तरुणी, सर्वसामान्य नागरिक, दुकानदार, व्यापारी कुणीही सुरक्षित राहिला नाही. सर्वसामान्य माणसांना दादागिरी केली असून जीवघेणे हल्ले करून खुनाचे प्रयत्न होत आहे तर गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचे पाप एमआयडीसी व तोफखाना पोलीस करत आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकांनी या भागातील ज्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे अशांना तातडीने तडीपार करावे व एमआयडीसी खंडणीमुक्त व हप्तेवसुलीमुक्त करावी. बोल्हेगाव–नागापूर परिसरात रात्रीची गस्त वाढून चौकाचौकात बसणाऱ्या टोळ्यांचा बंदोबस्त करावा या भागातील रहिवासी भागात सुरू असलेला वेश्याव्यवसाय बंद करण्यात यावा, अशी मागणी दत्ता पाटील सप्रे यांनी केली आहे.


पत्रकार परिषदेमध्ये बोलताना माजी नगरसेवक दत्ता पाटील सप्रे आदी.

या भागात रात्री–अपरात्री मोटरसायकलवर टोळके फिरते. चौकामध्ये टवाळक्या करत असून महिला, मुलींची छेडखानी होते यासाठी पोलिसांनी विशेष गस्त सुरू करून या टोळक्यांना आवर घालण्याची गरज आहे. एमआयडीसी परिसरातील नागापूर, बोल्हेगाव फाटा, बोल्हेगाव पुल, लोकवस्तीतील अंतर्गत चौक अशा परिसरातील चौकांमध्ये रात्री ११ नंतर तरुणांची टोळकी बसून राहतात व हे रस्त्यावर का थांबतात अशी विचारणा करण्यासाठी पोलीस पथक या भागात येत नाही त्यातूनच गुन्हेगारी वाढली आहे. या टोळक्यांना काहींचा राजकीय वरदहस्त असल्याने त्यांची मुजोरीही वाढली आहे. गेल्या काही वर्षापासून नगर शहराचा विस्तार होत आहे. बोल्हेगाव, एमआयडीसी, नागापूर, तपोवन रोड आदी महापालिका हद्दीतील उपनगरांमध्ये दिवसेंदिवस लोकवस्ती वाढत आहे परंतु या लोकवस्तीला आता गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांपासून धोका निर्माण झाला आहे. या भागातील गुन्हेगारी घटनांमध्येही वाढ झाली आहे. सद्यस्थितीत नगर शहरात कार्यरत असलेल्या कोतवाली व तोफखाना या दोन पोलीस ठाण्यांच्या अंतर्गतच हा सर्व भाग येतो. क्षेत्रफळाच्या दृष्टीने व वाढती गुन्हेगारी लोकसंख्या रहदारी आदी बाबी लक्षात घेता बोल्हेगाव, सावेडी भागासाठी स्वतंत्र पोलीस ठाणे देण्यात यावे. तोफखाना, सावेडी व एमआयडीसी पोलीस ठाण्यासाठी स्वतंत्र पोलीस उपअधीक्षक दर्जाचे अधिकारी द्यावे अशी मागणी दत्ता पाटील सप्रे यांनी केली असून, या भागातील गुन्हेगारांकडून चोरी, घरफोडी यांच्यासह घातक शस्त्रासह खुनाचा प्रयत्न करणे, खंडणी मागणे, कामगारांकडून हप्ते वसुली करणे, अवैध सावकारकी व वेश्याव्यवसाय असे गंभीर गुन्हे केले जात आहेत. सर्वसामान्य लोकांवर दहशत निर्माण करून सार्वजनिक व्यवस्था धोक्यात आणली आहे त्यामुळे या गुन्हेगारी विरोधात कोणीही पोलीस ठाण्यापर्यंत जाण्याची हिंमत करत नाही. मागील काही दिवसांतील घटना पाहता चाकूहल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न, एमआयडीसी परिसरात दहशत निर्माण करणे, अवैध सावकारी किंवा त्या अंतर्गत कामगारांना वेठीस धरणे आदी प्रकार उघडकीस आले आहे.

या सर्व गुन्हेगारी कृत्याकडे एक जबाबदार लोकप्रतिनिधी व नागरिक म्हणून शांतपणे पाहणे शक्य नाही. आम्ही लोकप्रतिनिधी असल्याने या भागातील नागरिकांच्या सुरक्षेची आम्हाला काळजी आहे. चौकाचौकात बिंगोचे व मटक्याचे अड्डे सुरू असून, त्यांना कोणत्या पोलिसांचा आशीर्वाद आहे? असा सवालही दत्ता पाटील सप्रे यांनी केला. तेव्हा जिल्हा पोलीस अधीक्षकांनी बोल्हेगाव, नागापूर, एमआयडीसी भागातील गुन्हेगारी सक्तीने मोडून काढावी व या भागाचा बिहार होण्यापासून वाचवावे अन्यथा आम्हाला नागरिकांसह रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडावे लागेल, असा इशाराही दत्ता पाटील सप्रे यांनी घेतलेला पत्रकार परिषदेमध्ये सांगितले.

## सिद्धार्थनगर परिसरातून अल्पवयीन मुलगा व मुलीचे अपहरण

नगर – शहरातील परिसरातील सिद्धार्थनगर परिसरातून १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी व १२ वर्षीय अल्पवयीन मुलगा असे दोघांचे कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी अपहरण केल्याच्या २ वेगवेगळ्या घटना ८ व ९ फेब्रुवारी रोजी घडल्या आहेत.

याबाबतची माहिती अशी की लाल टाकी परिसरातील सिद्धार्थ नगर, साठे चौकातील बंगल्यासमोर ८ फेब्रुवारीला संध्याकाळच्या वेळेस खेळणाऱ्या बारा वर्षीय अल्पवयीन मुलास कोणीतरी अज्ञात इसमाने फूस लावून अज्ञात कारणासाठी त्याचे अपहरण केले. याप्रकरणी अपहृत मुलाच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाच्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली.

या घटनेत पाठोपाठ सिद्धार्थ नगर परिसरातील १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी रात्रीच्या वेळी कुटुंबासह झोपलेली असताना ९ फेब्रुवारीला पहाटे बाथरूमला गेली की पुन्हा माघारी आली नाही. त्यामुळे तिच्या घरच्यांनी तिचा सर्वत्र शोध घेतला असता ती कुठेही मिळून आली नाही. यावरून या मुलीचे कुणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात करण्यासाठी अपहरण केले असल्याची तक्रार तिच्या वडिलांनी तोफखाना पोलीस ठाण्यात दिली. या वरुन पोलिसांनी अज्ञात इसमाविरूद्ध अपहरणाच्या गुन्ह्याची नोंदणी केली. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पुनम श्रीवास्तव या करीत आहे.

## कल्याण रोडवर चौघांकडून तरुणाला बेदम मारहाण

नगर – चेष्टा मस्करी करू नकोस, मला चेष्टा मस्करी सहन होत नाही असे म्हटल्याचा राग आल्याने चौघांनी २८ वर्षीय तरुणास शिवीगाळ दमदाटी करत लाथा बुक्क्यांनी व लोखंडी पाईपाने बेदम मारहाण केली. ही घटना नगर कल्याण रोडवरील फटाका मार्केट जवळ, गणपती कारखाना येथे ९फेब्रुवारी रोजी दुपारी घडली.

याबाबतची माहिती अशी की प्रमोद सिताराम लोखंडे (वय २८, रा. भावना ऋषी सोसायटी, शिवाजीनगर, कल्याणरोड, अ.नगर) हा कल्याण रोडवरील फटाका मार्केट जवळील, गणपती कारखाना येथे कामास असताना टेम्पो चालक सॅन्डी जगधने (पूर्ण नाव माहित नाही. रा. गणेश नगर, कल्याण रोड) हा आला. आणि तो प्रमोद लोखंडे याची चेष्टा मस्करी करू लागला. त्यावर लोखंडे याने माझी चेष्टा मस्करी करू नकोस. मला चेष्टा मस्करी सहन होत नाही. असे बोलला असता जगधने यास त्याचा राग आला. त्याने त्याला शिवीगाळ केली.

यावर लोखंडे याने मला विनाकारण शिवीगाळ करू नकोस असे म्हणला असता जगधने याने फोन करून त्याच्या तीन मित्रांना बोलावून घेतले. व त्यांनी लोखंडे यास शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी व जगधने याने लोखंडी पाईपाने बेदम मारहाण केली. यावेळी लोखंडे याने केलेल्या आरडाओरडामुळे गणपती कारखान्याचे मालक देवतरसे व गणेश इप्पडपेल्ली यांनी येऊन भांडण सोडवले. या मारहाणीत प्रमोद लोखंडे हा जखमी झाला. त्याच्या गळ्यातील सोन्याचे बदाम कोठेतरी गहाळ झाला.

याप्रकरणी पोलिसांनी प्रमोद लोखंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चौघांविरुद्ध मारहाणीच्या गुन्ह्याची नोंद केली असून पुढील कारवाई पोलीस नाईक साठे करीत आहे.

## बालगृहातून अल्पवयीन मुलगा बेपत्ता

नगर – शहरातील झारेकर गल्ली येथील मुलांचे निरीक्षणगृह व बालगृह येथुन अंघोळी करीता बाहेर सोडलेल्या ११ वर्षीय मुलाचे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याची घटना ८ फेब्रुवारी रोजी सकाळी घडली.

या बाबतची माहिती अशी की नगर तालुका हद्दीतील चास शिवारात बेवारस स्थितीत मिळून आलेल्या ११वर्षीय मुलास नगर तालुका पोलिसांनी २२जानेवारी पासून नातेवाईक मिळुन येईपर्यत तात्पुरता निवारा म्हणुन मुलांचे निरीक्षणगृह व बालगृह झारेकर गल्ली, येथे दाखल केले होते. ८ फेब्रुवारी रोजी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास संस्थेतील सर्व मुलांना अंघोळी करीता सोडले होते. त्यावेळी साधारणतः पंधरा मिनिटांनी सर्व मुले बाथरुमचे बाहेर आले. मात्र सदर मुलगा अंघोळीचे ठिकाणी बाथरुमचे आजुबाजुस दिसुन आला नाही. त्यामुळे बालगृहाचे काळजीवाहक तुळसीदास शंकर एक्कलदेवी (वय ४४, रा.तुळजाभवानी मंदीराजवळ, झारेकर गल्ली, अ.नगर) यांनी त्याचा आजुबाजुला शोध घेतला असता तो मिळुन न आल्याने त्यांनी याबाबत दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिसांनी अज्ञात इसमाविरुध्द अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोसई कृष्णकुमार सेदवाड हे करीत आहेत.

## काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष पदासह पक्ष सदस्यत्वाचा किरण काळेंचा राजीनामा

नगर – किरण काळे यांनी काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष पदासह पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. प्रदेशाध्यक्ष आ. नाना पटोले यांच्यासह अखिल भारतीय वर्किंग कमिटीचे सदस्य, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरातांना त्यांनी राजीनामा पाठविला आहे. सुमारे साडेचार वर्षांपूर्वी शहर काँग्रेसच्या नेतृत्वाची धुरा सोपविली होती. त्यानंतर फेरनिवड करत त्यांना दुसऱ्यांदा संधी दिली होती. ग्रामीण जिल्हा काँग्रेसच्या प्रभारी जिल्हाध्यक्ष पदाची देखील जबाबदारी काही काळ सोपविण्यात आली होती.



किरण काळे यांनी जाहीर पत्र लिहीत थोरातांचे आभार मानले आहेत. या पत्रात त्यांनी म्हटले आहे की, माझ्या सारख्या सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या, वलयांकित राजकीय पार्श्वभूमी नसणाऱ्या, तरुण नेतृत्वाला अत्यंत कमी वयात राष्ट्रीय पक्षाच्या शहर जिल्हाध्यक्ष पदावर काम करण्याची संधी थोरातांनी दिली. महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून शहरातील विविध समस्या सोडण्यासाठी मी काम करू शकलो. सत्तांतरा नंतर विरोधी पक्ष म्हणून नागरिकांच्या हितासाठी कायम संघर्षाची भूमिका घेतली. या काळात थोरातांनी मला बळ दिले. भरभरून प्रेम दिलं. माझ्या कामाचा गौरव केला. त्यामुळे अहिल्यानगरच्या विकासासाठीची आणि शहराला दहशतमुक्त करण्यासाठीची लढाई लढण्या करिता मला कायम प्रेरणा मिळाली.

दरम्यान, लवकरच पुढील राजकीय दिशा स्पष्ट करणार असल्याचे किरण काळे यांनी म्हटले आहे.

## २३ वर्षीय युवकाची गळफास घेत आत्महत्या

नगर – बाराबाभळी (ता. नगर) परिसरात राहत असलेल्या एका परप्रांतीय युवकाने त्याच्या रूममध्ये गळफास लावून घेत आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. जयपाल आसाराम पांडर (वय २३, सध्या रा. साईदिप अपार्टमेंट, प्रकाश हॉटेलमागे, बाराबाभळी, ता. नगर, मूळ रा. रंगाईसर, ता. सरदार शहर, जि. चोस, राजस्थान) असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे.

तो सध्या राहत असलेल्या रूम मध्ये त्याने ७ फेब्रुवारीला रात्री पंख्याच्या हुकाला पांढऱ्या रस्सीने गळफास घेतला. जयपालला त्याचा मित्र कन्हैय्या लाल याने बेशुध्द अवस्थेत सिव्हील हॉस्पिटल येथे दाखल केले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच रात्री ११.०५ वाजता वैद्यकीय अधिकार्यांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेची माहिती पोलीस अंमलदार दीपक गांगर्डे यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दिली. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलीस अधिक तपास करत आहेत.

## जहीर खान यांचे हृदयविकाराने निधन

नगर – शेवगावचे एस टी पार्सल ऑफिसचे संचालक जहीर




उमरदराज खान यांचे ८ फेब्रुवारी रोजी सकाळी शेवगाव येथे हृदयविकाराच्या धक्याने निधन झाले आहे. जहीर खान हे अ.नगर जिल्ह्यातील तब्लिग जमातचे संस्थापक सदस्य होते. सामाजिक कार्यात त्यांचे फार मोठा योगदान होते.

त्यांच्या पश्चात ४ भाऊ व ४ मुले आहेत. डॉ. उमेर यांचे वडील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष शाहानवाज खान यांचे ते धाकटे बंधू तर राष्ट्रवादी काँग्रेस अल्प विभागाचे जिल्हाध्यक्ष अथर खान यांचे ज्येष्ठ बंधू होत. त्यांचा दफनविधी शेवगाव येथील कब्रस्थान येथे करण्यात आला.

## सुर्यकांत बागडे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – बालाजी सोसायटी शिवाजीनगर अहिल्यानगर येथील



रहिवासी सुर्यकांत गोविंद बागडे (वय ८५) यांचे ८ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, मुलगी असा परिवार आहे. ते बागडे मंडपचे संचालक होते. रविंद्र बागडे यांचे ते वडील होत.

## न्यायालयाच्या निकालानंतरही देयके मिळत नसल्याने कामगारांमध्ये संतप्त भावना, सामुदायिक आत्मदहन करण्याचा इशारा, थकीत देयकांसाठी कंपनीसमोर केले ठिय्या

नगर – बुऱ्हाणनगर (ता. नगर) येथील व्हिडिओकॉन (सध्याची फोर्स अप्लायन्स) कंपनीतील कामगारांनी मार्च २०१८ पासूनची थकीत पगाराची देयके मिळावी म्हणून नगर जिल्हा मजदूर सेनेच्या वतीने कंपनी समोर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. न्यायालयाचा निकाल लागूनही पगार न मिळाल्याने कामगारांमध्ये संतप्त भावना आहेत. जोपर्यंत थकीत देयके मिळत नाही, तोपर्यंत आंदोलन थांबणार नाही, असा निर्धार कामगारांनी व्यक्त केला आहे. याशिवाय, देयके न मिळाल्यास सामुदायिक आत्मदहन करण्याचा इशारा देखील त्यांनी दिला आहे.

नगर जिल्हा मजदूर सेनेच्या माध्यमातून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले यांच्या नेतृत्वाखाली कामगारांनी आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनात विद्या पवार, आप्पासाहेब पाटील, मीना रोकडे, बिजली लांडे, सुनिता क्षीरसागर, रवींद्र कुदळे, पाराजी पानसंबळ, अनिल गादिया, लक्ष्मण लोखंडे, नितीन गांधी यांच्यासह अनेक कामगार सहभागी झाले आहेत. रविवारी (दि.९ फेब्रुवारी) या आंदोलनाचा दुसरा दिवस होता.


व्हिडिओकॉन (सध्याची फोर्स अप्लायन्स) कंपनीतील कामगारांनी मार्च २०१८ पासूनची थकीत पगाराची देयके मिळावी म्हणून नगर जिल्हा मजदूर सेनेच्या वतीने कंपनी समोर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे.

व्हिडिओकॉन कंपनीतील १५० ते २०० कामगारांना मार्च २०१८ पासून पगार मिळालेले नाहीत. कंपनी कडून कामगारांना ३.५ कोटी रुपयांची देयके देणे बाकी आहे. यामधील ३० कामगारांनी न्यायालयात दावा दाखल केला होता. न्यायालयाने २०२३ मध्ये निकाल देऊन, कंपनीला सर्व कामगारांची थकीत देयके देण्याचे आदेश दिले होते. तथापि, आजतागायत कामगारांना त्यांचे देयके मिळालेली नाहीत. कंपनीच्या जागेवर एका बँकेने ताबा घेतला असून, ती मालमत्ता विक्री केली आहे. परंतु, विक्रीनंतर देखील कामगारांचे देयके अद्याप दिलेले नाहीत, यामुळे कामगारांत मोठा रोष पसरला आहे.

बाबुशेठ टायरवाले यांनी सांगितले की, बँकेला न्यायालयाच्या आदेशानुसार कामगारांची थकलेली देयके मालमत्ता विक्री पश्चात देणे बंधनकारक आहे. परंतु, बँकेने परस्पर जागा विकून कामगारांवर अन्याय केला आहे. कामगारांच्या न्याय हक्कासाठी हा लढा तीव्र केला जाईल, असे त्यांनी ठामपणे भूमिका स्पष्ट केली.

कंपनीतील महिला कामगार मीना रोकडे यांनी सांगितले की, मार्च २०१८ पासून वेतन दिलेले नाही, त्यामुळे सर्व कामगारांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतर देखील देयके मिळत नसल्यास, हे कामगारांसाठी एक मोठी शोकांतिका आहे. कामगारांचा जीवन जगणे–मरण्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे स्पष्ट केले. न्याय, हक्कासाठी संघर्षमय लढाई अजूनही चालू आहे, आणि यासाठी आक्रमक भूमिकेच्या तयारीत असल्याची भावना कामागरांनी व्यक्त केली.

## छावणी परिषद शाळेचे मुख्याध्यापक संजय शिंदे यांना उत्कृष्ट बीएलओ पर्यवेक्षक पुरस्कार

नगर – लोकसभा व विधानसभा निवडणुकीत याद्या अपडेट करून प्रत्यक्ष मतदान वाढवण्यास मदत केल्याबद्दल तसेच निवडणुकीशी निगडित बूथलेव्हलवर सर्व बीएलओ यांच्याशी समन्वय ठेवून निवडणूक विषयक उपक्रमामध्ये सहभागी होऊन दिलेल्या विशेष योगदानाबद्दल राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात उत्कृष्ट बीएलओ पर्यवेक्षक म्हणून छावणी परिषदेच्या पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेचे मुख्याध्यापक


संजय शिंदे यांना सन्मानपत्र देताना जिल्हाधिकारी सिद्धाराम सलीमठ, जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला, आयुक्त यशवंत डांगे, उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी राहुल पाटील, प्रांतधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे.

संजय शिंदे यांना अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी सिद्धाराम सलीमठ यांचे हस्ते प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात आले. यावेळी जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला, महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी राहुल पाटील, प्रांतधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे, नायब तहसीलदार सुधीर उबाळे आदी उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे, मनोनीत सदस्य वसंत राठोड, गट शिक्षण अधिकारी बाबुराव जाधव, केंद्रप्रमुख संजय धामने आदींनी शिंदे यांचे अभिनंदन केले आहे.


जगभरात १४३ देशात ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या सोनई सेवाकेंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी उषा दीदी यांनी अभिनेत्री जयाप्रदा यांची पुण्यात भेट घेऊन संस्थे द्वारा जगभरात शिकविल्या जाणाऱ्या राजयोग ध्यान पध्दती बद्दल माहिती देऊन संस्थेच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालय माऊंट आबू ला भेट देण्याचे निमंत्रण दिले. तसेच त्यांना ध्यानधारणेची पुस्तके व लक्ष्मीनारायणाची फ्रेम भेट दिली. यावेळी बाणेर सेवाकेंद्राच्या संचालिकाब्रह्माकुमारी डॉ. त्रिवेणी व व बी के डॉ. दीपक हरके उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### खजुराच्या बियांचा असाही वापर

खजूर जेवढे फायदेशीर आहेत तितकेच त्याच्या बिया देखील फायदेशीर आहेत. पण आपण खजुराच्या बिया टाकून देतो. खजुराच्या बिया वाळवून आणि बारीक करून पावडर बनवता येते. या पावडरचा वापर तुम्ही कॉफी सारखे पेय तयार करण्यासाठी करू शकता. कॅफिन मुक्त असण्याव्यतिरिक्त ते अँटिऑक्सिडंटने देखील समृद्ध आहे.

## पाककला

### रवा केक

**साहित्य :** २ वाटी बारीक रवा, १ वाटी ताजे दही, १ वाटी पिठी साखर, १ वाटी दुध, १/४ वाटी तेल, १ चमचा वॅनिला इसेन्स, थोडी टुटी फ्रुटी, १ वाटी मीठ कूकरमधे तळाला घालण्यासाठी, १ चमचा बेकिंग पावडर, १ चमचा बेकिंग सोडा

**कृती :** प्रथम दही फेटून घ्यायचे, फेटलेल्या दह्यात तेल आणि पिठी साखर नीट मिक्स करून घ्यायचे. नंतर त्यात एक चमचा व्हॅनिला इसेन्स घालायचे. नंतर त्यात रवा नीट मिक्स करून १५-२० मिनीटे झाकून भिजण्यास ठेवावे. आता बेकिंगसाठी गॅसवर कुकर गरम करण्यास ठेवावे, कुकरच्या तळाला एक वाटी मीठ टाकून घ्यावे. रवा भिजल्यामुळे दही पूर्णपणे शोषून घेतो, आता ह्यात लागेल तसे दुध घालून केकचे बॅटर सॉफ्ट बनवून घेऊन यातच बेकिंग सोडा व बेकिंग पावडर छान मिक्स करून घेऊन तेल लावून ग्रीस केलेल्या केकच्या टिनमध्ये थोडी टुटी फ्रुटी घालून त्यावर हे बॅटर पसरवून घ्यावे. वरूनही थोडी टुटी फ्रुटी टाकून केकचा टिन गरम केलेल्या कुकरमध्ये स्टँड ठेऊन त्यामध्ये बेक करण्यासाठी ठेवावे, कुकरची शिट्टी व रिंग काढून कुकरचे झाकण बंद करावे. साधारण ४० मिनीटे मेडिअम गॅस फ्लेमवर ठेवावे.

## वास्तू

### अग्नेय दिशेसंबंधी

* पॉवर जनरेटर्स, इन्व्हर्टर्स, कॉम्प्युटर, सर्व्हर विभाग तसेच विशेष संशोधन विभाग आग्नेय भागात असावेत.
* सर्व वर्गांची लांबी-रुंदी एकास दीड अथवा एकास दोन या प्रमाणात असावी.
* स्टाफ रूम पश्चिम दिशेत घेतल्यास उत्तम.

## सल्ला

पाय किंवा अंग दुखत असल्यास मिठ घातलेल्या गरम पाण्याने आंघोळ करावी.

## सौंदर्य

एका टबमध्ये कोमट पाणी घ्या आणि त्यात १ टेबलस्पून मध घाला. नंतर तुमच्या टाचांना या पाण्यात ८ ते १० मिनिटे बुडवा. पाय स्वच्छ व सुंदर दिसतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, माघ शुक्लपक्ष, पुष्य १८।३४, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** मनोबल व आत्मविश्वास वाढविणारी एखादी घटना घडेल. आपल्या प्रिय व्यक्तींचा सहवास लाभेल.

**वृषभ :** व्यवसायातील आर्थिक महत्त्वाची कामे मार्गी लावू शकाल. सहकाऱ्यांशी शक्यतो वाद होणार नाहीत.

**मिथुन :** मनोबल व आत्मविश्वास उत्तम राहील. जिद्द व चिकाटीने कार्यरत राहून कामे मार्गी लावू शकाल.

**कर्क :** महत्त्वाचे निर्णय घेणे धोक्याचे ठरेल. तांत्रिक वस्तू व वाहने बिघडतील. एकंदर दिवस खराब असेल.

**सिंह :** वैवाहिक सौख्य लाभेल. मानसिक प्रसन्नता लाभेल. बाहेरचे जेवण आरोग्य समस्या निर्माण करेल.

**कन्या :** आजचा दिवस फायदेशीर ठरेल. आरोग्याच्या किरकोळ समस्या येतील.

**तूळ :** व्यवसायात उधारी, उसनवारीची कामे यशस्वी होणार आहेत.

**वृश्चिक :** तुमच्या राहत्या जागेचे किंवा प्रॉपर्टीच्या जागेचे प्रश्न सोडवू शकाल. जुने मित्र व नातेवाईक भेटतील.

**धनु :** हाती घेतलेल्या कामात यश मिळवाल. जिद्द व चिकाटी वाढेल.

**मकर :** प्रॉपर्टीची कामे मार्गी लागतील. व्यवसायातील आर्थिक गुंतवणूक फायदेशीर. जुने मित्र भेटतील.

**कुंभ :** रखडलेली कामे मार्गी लावू शकाल. आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील.

**मीन :** शैक्षणिक व बौद्धिक क्षेत्रातील व्यक्तींना दिवस चांगला जाईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

### बिलंदर सूचना

एक मनुष्य सार्वजनिक स्नानगृहात आंघोळीला गेला. दार लावून घेतले. त्याबरोबर दारावर लिहिलेल्या सूचनेकडे त्याचे लक्ष गेले. तेथे लिहिले होते मागे बघा. मागे वळून पाहिले तर सूचना होती डावीकडे पहा. डावीकडे पाहिले तर सुचना होती नुसते इकडे तिकडे बघायला आला आहात की स्नान करण्यासाठी आला आहात?'

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी स्कील इंडियाने कोणाबरोबर समझोता केला आहे? - सॅमसंग

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७१११ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७११० चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) तेलंगणाची राजधानी ५) दांडूची जोडीदारीण ७) उत्तराधिकारी; हक्कदार ८) बेताल; आवश्यकतेपेक्षा जास्त ९) मोठी नदी १०) उकडत असताना वारा घेण्याचे साधन ११) प्रचारात असलेला; जाहीर १३) वस्तुमात्राचे संबोधन; नाव; गंधाचा टिळा १६) घोंगडी तयार करणारा एक समाज; मेंढपाळ १८) मुस्लीम पुरुषाचे एक नाव २०) पांढरा; शुभ्र २१) झरोका; खिडकी; गवाक्ष २४) मऊ; मवाळ; मृदू २५) दाणेदार; रवाळ

**उभे शब्द :-** १) पशू; जनावर २) जोराने फुटून बाहेर आलेला ३) ढीग; चळत; चवड ४) हॉस्पिटल; रुग्णालय ५) आकाशातून जाणारे एक वाहन ६) वस्त्रास दोरा घालणे; शब्दार्थ वगैरेंचे स्पष्टीकरण १२) मेघ; घन; आभाळ १४) हांजी हांजी; खुशामत; आर्जव १५) पोलिसांतील एक पद; पु. ल. देशपांडे यांचे एक नाटक १६) श्रीमंत; सधन; मालदार १७) रत्न १९) एक केंद्रशासित प्रदेश - दमण ++ २२) धातूचा दोरा २३) मृत्यूचा देव

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** ध्येयाच्या नौकेत बसून प्रयत्नांचे वल्हे मारले म्हणजे यशाचा किनारा दूर राहत नाही.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### कुत्री रात्री का भुंकतात?

कुत्रा हा सर्वांत इमानदार प्राणी समजला जातो. त्यामुळे कुत्रा पाळण्याकडे लोकांचा कल जास्त असतो. प्रत्येक पाळीव प्राण्याचे काही विशेष गुणधर्म असतात. कुत्रा ही त्याला अपवाद नाही. सामान्यपणे कुत्रा हा रात्रीच्या वेळी जागा राहतो. रात्री तो जास्त सक्रिय असतो. आता यामागे नेमकं कोणतं कारण असावं, असा प्रश्न साहजिकच तुमच्या मनात आला असेल. कुत्रा रात्रीच्या वेळी सक्रिय राहण्यामागे काही शास्त्रीय कारणं आहेत.

कुत्रा हा इमानदार प्राणी आहे. घर, शेताचे संरक्षण करण्यासाठी तो मदत करतो. कुत्रा हा प्राणी रात्रीच्या वेळी जास्त सक्रिय असतो. त्यामुळे रात्री कुत्र्याचा भुंकण्याचा आवाज जास्त प्रमाणात येतो. कुत्र्याला भूत-पिशाच्च दिसतं म्हणून तो घाबरून रात्री जागा राहतो, असा काही लोकांचा समज आहे. पण कुत्रा रात्रीच्यावेळी सक्रिय राहण्यामागे शास्त्रीय कारणं आहेत. रात्रीच्या वेळी रस्त्यावर कुत्री सातत्याने भुंकत असतात.

जर गल्लीत किंवा कॉलनीत एखादा दुसरा कुत्रा, प्राणी किंवा अनोळखी माणूस आला तर कुत्र्यांचं भुंकणं सुरू होतं. तज्ज्ञांच्या मते, दुसऱ्या परिसरातील एखादा कुत्रा त्यांच्या क्षेत्रात आला तर आपल्या क्षेत्रातील अन्य कुत्र्यांना सावध करण्यासाठी कुत्रा रडायला सुरुवात करतो. त्यामुळे त्यांना रात्री झोप येत नाही. याशिवाय तब्येत बिघडली किंवा जखम झाली असेल तर कुत्र्याला रात्री झोप येत नाही. आसापास एखाद्या आत्म्याचा वावर असेल तर कुत्रा घाबरून रडतो त्यामुळे त्याला झोप येत नाही, असा समज आहे. याचाच अर्थ भूत, पिशाच्च्यासारख्या गोष्टी सामान्य माणसाला दिसत नाहीत त्या कुत्र्यांना दिसतात आणि तो रडू लागतो, हा समज मात्र चुकीचा आहे. असं मानलं जातं. रात्रीच्या वेळी एखादा कुत्रा रस्ता चुकला तर तो भुंकू लागतो किंवा आपल्या कुटुंबापासून विलग झालेला कुत्रा निराशेपोटी रात्रभर जागतो आणि भुंकत राहतो.

### संपत्तीचा उपयोग

एका कंजूष मनुष्याने आपल्याजवळील सर्व संपत्ती हे विकून आलेल्या पैशाची सोन्याची लगड बनवून घेतली व ती एका जागी पुरून ठेवली. तो मनुष्य रोज त्या सोन्याच्या लगडीकडे डोळे भरून पाहात असे व समाधान मानीत असे.

एका मजुराने त्याच्यावर लक्ष ठेवले आणि त्याला त्याचे गुपित समजले व त्याने गुपचूप ती सोन्याची लगड लांबविली व खड्डा पूर्ववत करून ठेवला.

दुसऱ्या दिवशी कंजूष मनुष्य त्या जागी गेला व खड्डा उकरून काढला. रिकामा खड्डा पाहून तो जोराने ओरडू लागला. रस्त्यावरून जाणाऱ्या मनुष्याने रडण्याचे कारण विचारले. सर्व हकीकत समजल्यावर तो म्हणाला,

''बाबारे, तुला दुःख करण्याचे काहीच कारण नाही. तुझ्याजवळ असलेल्या सोन्याचा तू वापर करीत नव्हतास. त्यामुळे त्याजागी एखादा दगड पुरून ठेव व त्या दगडाला सोने मानून रोज पाहात जा.''

तात्पर्य : मनुष्य आपल्याजवळ असलेल्या गोष्टीचा, वस्तूचा उपभोग घेत नसेल, तर अशा वस्तू असूनही त्या नसल्यासारख्याच असतात.

## रहमते दर्शन (भाग - १)



### महाराज जी द्वारा मेरे पोते की रक्षा

उस बूढ़े को दे दिया। इस प्रकार उन्होंने जीवन भर के लिए साँस की बीमारी इस उपकार के बदले अपने ऊपर ले ली।

एक बार की बात है कि एक महिला की ड्यूटी किसी सत्संग सेंटर पर सत्संग करने की थी। उन दिनों सत्संग केंद्रों पर महिलायें ही सत्संग किया करती थीं। जब यह महिला सत्संग करने के बाद अपने घर को लौट रही थी तो एक बदमाश आदमी उसके पीछे पड़ गया। वह औरत तेज़ कदमों से चलने लगी, परन्तु बदमाश भी उसके पीछे चलता रहा। एक सुनसान स्थान पर आकर जैसे ही वह बदमाश उसको पकड़ने लगा, तो वहाँ संत दर्शनसिंह जी महाराज हाथ में नंगी तलवार लिए एकाएक प्रकट हो गये। और इस प्रकार वह बदमाश उनको देखकर भाग गया।

एक बार कृपाल आश्रम में रहने वाली एक औरत जोर-जोर से शोर मचाने लगी, मेरे रब्ब का दरबार, मेरे साहिब का दरबार। जब वह काफी देर तक यही वाक्य रटती रही तो हमने उसे पागल समझकर अस्पताल भर्ती करा दिया, लेकिन वह औरत अस्पताल से भागकर जंगलों में छिप गयी। किसी को उसका कोई भेद नहीं लगा। महाराज जी के पास जब इस घटना की सूचना दी गयी, तो उन्होंने उस औरत की सलामती का आश्वासन दिया। उस औरत के अनुसार जब वह जंगल में थी तो महाराज जी उसके पास ही थे और उसको लेकर गुरुद्वारा शीशगंज पहुँचे और उसे वहाँ प्रबन्धकों के हाथों सौंप कर उसका ध्यान रखने के लिए कहा। अगले दिन जब उसका लड़का पुनः आश्रम में आया और अपनी माँ के बारे में पूछने लगा तो महाराज जी ने उसे गुरुद्वारा शीशगंज जाकर अपनी माता को वापिस लाने के लिए कहा।

एक बार मैं महाराज जी से मिलने रोहतक से दिल्ली आया । गर्मी के दिन थे। काफ़ी रात हो चुकी थी। तब महाराज जी ने मुझे अपने पास ठहरा लिया। रात को मैंने देखा कि महाराज जी एकाएक काफी बेचैन हो गये। कभी वे पलंग से उठकर छत पर चले जाते और हुए घूमने लगते और जब काफी थक जाते तो फिर कमरे में वापिस आ जाते।

सरदार मनोहर सिंह दुग्गल रात भर उनका शरीर दबाते रहे। सुबह तैयार होकर जब वे 'मोना कॉटेज', जहाँ कुछ विदेशी भाई ठहरे। थे, जा रहे थे तो एक सेवादार अपने लड़के का एक्स-रे लिए उनके पास आया। एक्स-रे को महाराज जी को थमाते हुए कहने लगा कि महाराज जी, डॉक्टरों ने जवाब दे दिया था कि लड़के का बचना मुश्किल है, लेकिन आपकी दया से वह बचा अब बिल्कुल ठीक है। तब महाराज जी ने उत्तर दिया, रात को मेरी बेचैनी का कारण यह बच्चा ही था। और इस प्रकार उन्होंने उस बच्चे के कर्म अपने ऊपर ले लिए और उसे जीवनदान दे दिया।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

कि हमारी कोशिश शब्दो के माध्यम से उन्हे करीब लाने की होती है। अनगिनत परिवार और व्यवसाय इसलिए बिखरते हैं क्योंकि लोग अपनी सूझबूझ और जोड़ने के भाव पैदा करने के बजाय ऐसी बातचीत का उपयोग करते हैं, जो उन्हे एक दूसरे से दूर ले जाते हैं। हम बोलने की ऐसी कला का विकास कर सकते हैं कि लोगों को हम से चर्चा करते हुए खुशी महसूस हो। इसे कैसे संभव बनाया जाए। डांटने डपटने और तिकड़म बाजी से लोगो के साथ सार्थक संबंध नहीं बनाए जा सकते। ऐसे उपायों से प्राप्त ताकत अथवा नियंत्रण आखिर में स्पष्ट और ईमानदार बातचीत के आगे हार जाते हैं। असली जीत के लिए आस पास केंद्रित प्रवृतियों को छोड़ कर बातचीत में दूसरो के प्रति समझबूझ और सहयोग के तरीको की ओर बढ़ना होगा प्रत्येक व्यक्ति अपने सोचने के तरीके से अपनी कथनी और करनी को नियंत्रित कर सकता है। लोग वार्तालाप संबंधित । किसी भी क्षेत्र में सफलता के लिए गलतियां दोहराते चले जाते सार्थक चर्चा से बढ़ कर कुछ भी नहीं है। प्यार जाहिर कर पाने से मिलने वाला आनंद अतुलनीय है। प्यार से दायरा बढ़ता है, रुझान का विकास होता है। आशाएं फिर से जागने लगती हैं।

### दिमाग की शक्ती

प्यार से हताशा मिटने लगती है। मन के घाव भरने लगते हैं। कभी कभी हमारे शब्द विपरीत प्रभाव पैदा कर देते हैं। हमारे शब्दों से दूसरे की भावनाओं को ठेस पहुचती है। आक्रोश पैदा होता है। दिलो में दूरी बन जाती है। हम बातचीत को टालने लगते हैं। हमें किसी भी तरह इस दुष्चक्र से बचना होगा। दिल में दूरी तब बनती है जब हम उस व्यक्ति की बुरी बातें हर समय सोचते रहते हैं। इसकी बजाय अपने किसी गुण के बारे ज्यादा सोचा करो या एक शब्द मैं शांत हूं तुम भी शांत हो यह रिपीट करते रहा करें। कटर विरोधी बातचीत में तुरंत सफलता जैसी कोई चीज नहीं होती है। अगर हमें बातचीत समझने या समझाने में दिक्कत पेश आ रही है तो हम पहला बातचीत की प्रक्रिया का कोई पक्ष जरूर नजर अंदाज कर रहे हैं। सरसरी तौर पर देखें तो वह पक्ष यह है कि आप अपना हित ज्यादा सोच रहे हैं, इसलिए समझ व समझा नहीं पा रहे हैं। बातचीत एक नियम है और नियम सीखे जाते हैं। बातचीत एक सिद्धांत हैं और सिद्धांत का अभ्यास किया जाता हैं बातचीत की समस्या को सुलझाना ही चाहिये। दूसरों को समझ कर और अपनी बात समझाकर हम अपने वर्तमान पलों का बेहतर इस्तेमाल कर सकते हैं। सब काम है उन व्यक्तियों की सूची बनाएं जिन से आप को सम्बन्ध बेहतर करने हैं। सम्बन्ध ठीक करने लिए पहला काम यह करना है कि आप कापी पर लिखेगें कि सर्वश्रेष्ट अभिव्यक्ति क्या है। विरोधी की कड़वी बातों का क्या जवाब दें कि हमारे संबंध मधुर बनें। हमारे पीछे जो मैजूद है अर्थात लोग हमारी अनुपस्थिति में बोलते हैं और हमारे सामने जो मौजूद हैं अर्थात लोग जो हमारे सामने बोलते हैं, वह उसकी तुलना में कुछ भी नहीं, जो हमारे मन में मौजूद है। यह सच है कि प्रत्येक व्यक्ति में कमियां हैं। फिर भी आप विशेष हैं। सब से खुल कर मिलना चाहिये और मन में दूसरों के कल्याण का भाव हो । प्रत्येक व्यक्ति की इच्छा होती है कि वह जिन भी व्यक्तियों से मिले उनसे कुछ प्राप्ति हो। हम धन तो सब को नहीं दें सकते परन्तु प्रेम विश्व की प्रत्येक आत्मा को दे सकते हैं। अगर दूसरों के प्रति प्रेम की भावना होगी तो आप के मुख से जो बोल निकलेंगे उसे लोग आराम से सुनेगें। आप जो बोलते हैं लोग वह नहीं सुनते।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

**१ वर्षानंतर बालकाला द्यावयाचा आहार :**

पिकलेले केळ, सफरचंद बालकाला भरवावे. सफरचंदाचा गर चमच्याने काढून बालकाला भरवावा. तसेच ताजा, मऊ, पातळ भात-वरण बालकाला भरवावा. चिकू, पपई, केळ कुस्करून बालकाला भरवावे. केळामुळे बालकाचा कफदोष वाढत असल्यामुळे केळामध्ये थोडे मध घालून बालकाला भरवावे. या काळात बालकाला पोळीचीही सवय लावावी. पोळीचे छोटे-छोटे तुकडे बाळाच्या हातात द्यावे. १ वर्षाचे बालक साधारणत: पोळी, भाजी (पातळ) वरण-भात असा आहार घेऊ शकते.

लहान वयातच बालकाला संपूर्ण आहाराची सवय लावावी, कारण लहान वयात नकळत लागलेली चव ही आयुष्यभर आवडते. लहान वयातल्या बालकाला आपण जो आहार देवू तो आहार बालक खाते. त्यांच्या आवडी त्यांना सांगता येत नाहीत; म्हणून चुकीचा आहार द्यायचा असेल, तर याच वयात बदलता येतो. लहान बालकांना साखर, चॉकलेट, बिस्किटे, कॅडबरी यांची चव माहीतच नसते. आपण त्यांना हे पदार्थ खायला देऊन त्यांची अशा प्रकारच्या पदार्थामधील रुची

### नवजात बालकाची परिचर्या

वाढवितो, म्हणून लहान बालकांना दुधामध्ये साखर न घालता दूध प्यायला दिले, तरी बालक पिऊ शकते. बिस्किटे, चॉकलेटस् यांच्याऐवजी खारीक, फुटाणे, शेंगदाणे द्यावे. बालकांचा खिसा नेहमी फूटाणे, शेंगदाणे, खजूर, ओले खोबरे, किसमिस याने भरलेला असावा, त्यामुळे खेळता-खेळता जर त्यांना भूक लागली. तर त्यांच्या खिशामधील पदार्थ ते खाऊ शकतात.

**३ ते ६ वर्षाच्या बालकांसाठी आहार :**

या वयातील मुले वरण-भात, तूप, पोळी, भाजी, ताक, कोशिंबीर असा संपूर्ण आहार घेतात. आहार हा चवीपुरता मर्यादित नसून त्याने बालकाच्या शरीराचे पोषण होईल अशा प्रकारचा असावा. या वयात बालकांना मॅगी, पिझ्झा, बर्गर, जॅम-ब्रेड अशा पदार्थांचे खूप आकर्षण असते व आई देखील नोकरी करत असल्यामुळे वेळेच्या अभावी हे पदार्थ मुलांच्या खाण्यामध्ये येतात. हे असे पदार्थ टिकण्यासाठी त्यांच्यामध्ये परिरक्षक (प्रिझर्वेटिव्ह) टाकलेले असते; त्यामुळे हे पदार्थ शरीरासाठी हानिकारक असतात. शाळेतील इतर मुले सुध्दा असे पदार्थ डब्यामध्ये घेऊन येतात; त्यामुळे आपले बालक देखील अशा पदार्थांची मागणी करते. अशा वेळी शाळेतील व्यवस्थापकांनी सुध्दा असे पदार्थ डब्यामध्ये आणू नये यासाठी सक्ती करायला हवी व त्याच बरोबर आपण देखील असे पदार्थ खाणे आरोग्याला हानिकारक आहे असे समजावून सांगावे. क्वचित कधीतरी हे पदार्थ खायला देण्यास हरकत नाही, परंतु वारंवार असे पदार्थ बालकाला खाऊ घालू नयेत. हे पदार्थ वारंवार बालकाला खाऊ घातल्याने त्वचेवर पांढरे डाग येणे, पोटामध्ये गॅस धरून पोट दुखणे, पोट साफ न होणे, जीवनसत्त्वांचा अभाव होणे इ. तक्रारी होतात. आईस्क्रीम, कोल्ड्रींक्स सारखे पदार्थ खाल्ल्यामुळे सरदी, खोकला, ताप हे विकार होतात. बालक वारंवार आजारी पडल्यामुळे त्याची होणारी शारीरिक व मानसिक वाढ खुंटते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# 'प्रिमियर लीग २०२५ क्रिकेट स्पर्धेत' क्रेडाई सेक्रेटरी संघाला विजेतेपद



क्रेडाई प्रिमियर लीग २०२५ क्रिकेट स्पर्धेत क्रेडाई सेक्रेटरी संघाला विजेतेपद मिळाले.

नगर – नगरच्या केडगांव मधील बेलोव्हेड ग्रेस या ठिकाणी अमित मुथा यांनी नव्याने उभारलेल्या येथील टर्फ क्लब वरती क्रेडाई प्रीमियर लीग २०२५ च्या स्पर्धा नुकत्याच पार पडल्या. या मध्ये क्रेडाई अहिल्यानगरच्या सेक्रेटरी (प्रसाद आंधळे) संघाने विजेतेपद मिळवले आहे. होम फर्स्ट फायनांस लिमिटेड यांचे संघाला उपविजेतेपद मिळाले. क्रेडाई सभासद, शासकीय विभाग, बँकांचे संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते. स्पर्धेत बेस्ट बॅटस्मनचे बक्षीस सार्थक सब्बन (होम फर्स्ट), बेस्ट बॉलर निलेश रासकर (सेंट्रल बँक) तर मॅन ऑफ दि सिरीज आणि अंतिम मॅच चे मॅन ऑफ द मॅच पुरस्कार हितेश ओबेरॉय (क्रेडाई) यांना मिळाला. खेळीमेळीच्या वातावरणात सर्वांनी स्पर्धेचा निखळ आनंद लुटला.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे, सहायक जिल्हा निबंधक शरद झोटिंग, भूमी अभिलेखचे उपअधीक्षक अविनाश मिसाळ, पुष्पा स्टीलचे प्रतीक चोरडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय अधिकारी शैलेंद्रकुमार सिन्हा, एचडीएफसी बँकेचे शाखाधिकारी उदय चौधरी, क्रेडाई महाराष्ट्रचे सहसेक्रेटरी आशिष पोखर्णा, स्पोर्ट कमिटी समन्वयक अमित वाघमारे, क्रेडाई अहिल्यानगरचे माजी अध्यक्ष संजय गुगळे, क्रेडाई अहिल्यानगरचे अध्यक्ष अमित मुथा, प्रेसिडेंट इलेक्ट गिरीश अग्रवाल, सेक्रेटरी प्रसाद आंधळे, खजिनदार दीपक बांगर उपस्थित होते.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, रोजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाला विरंगुळा हवा असतो. खेळामुळे मनोरंजन आणि व्यायाम दोन्ही साध्य होते. क्रेडाईने अभिनव क्रिकेट स्पर्धा घेवून सर्वांना एकत्र आणण्याचा अतिशय स्तुत्य उपक्रम राबविला. अशा एकत्र येण्यामुळे परस्पर संवाद वृध्दींगत होतो तसेच रोजच्या ताणतणावातून आनंदाचे क्षण अनुभवता येतात.

शरद झोटिंग म्हणाले, शासकीय अधिकारी, बँकांचे प्रतिनिधी आणि बांधकाम व्यावसायिक हे एकमेकांशी निगडीत घटक आहेत. या तिघांचाही कायम कामानिमित्त एकमेकांशी संबंध येतो. परंतु, आज याठिकाणी हे तीनही घटक खेळाच्या निमित्त एकत्र आलेत. अशा उपक्रमामुळे आपुलकी वाढते. संघभावना तयार होण्यास मदत आणि खिलाडूवृत्तीही वाढते. या स्पर्धेचा निखळ आनंद मिळाल्याने प्रत्येक जण नव्या ऊर्जेने आपल्या दैनंदिन कामकाजास सुरुवात करेल असा विश्वास आहे.

भूमी अभिलेख उपअधीक्षक अविनाश मिसाळ यांनी देखील या उपक्रमाचे स्वागत केले.

अमित मुथा यांनी स्वागत करताना या स्पर्धेतून सर्वांना एकत्र आणत एकमेकांशी गप्पागोष्टी करीत एकोपा वाढविण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले.

प्रसाद आंधळे यांनी स्पर्धेची माहिती व नियमावली सांगितली. दीपक बांगर यांनी आभार मानले. स्पर्धेत अहिल्यानगर तहसील कार्यालय, मनपा नगररचना विभाग, मुद्रांक अधिकारी कार्यालय, भूमी अभिलेख, क्रेडाई अहिल्यानगरच्या तीन टिम, सेंट्रल बँक, एचडीएफसी बँक, एलआयसी हाउसिंग फायनांस, होम फर्स्ट फायनान्स या संघांनी सहभाग नोंदविला.

स्पर्धेची नियोजन व्यवस्था धवल इंगळे, तुषार लोढा, नितेश गुगळे, शिवांग मेहता, सूरज गुगळे, यश गुगळे, राहुल अडसुरे, अमेय कुलकर्णी, प्रकाश मेहता, कमलेश झंवर, झोएब खान, संदीप भापकर, अमित फिरोदिया, अनिल पाटील, अनिल गांधी, हितेश ओबेरॉय आदी सभासदांनी पाहिली.



राज्य शालेय टेनिस क्रिकेटमध्ये उपविजेता ठरलेला सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाच्या संघातील खेळाडूंचा शाळेत सत्कार करण्यात आला.

# राज्यस्तरीय शालेय टेनिस क्रिकेट स्पर्धेत नगरच्या 'सावित्रीबाई फुले'स उपविजेतेपद

नगर – राज्यस्तरीय शालेय टेनिस क्रिकेट स्पर्धेत सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाच्या (राहुरी कृषी विद्यापीठ) मुलींच्या संघाने उपविजेतेपद पटकाविले. क्रीडा व युवक संचालनालय पुणे (महाराष्ट्र राज्य) व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धुळे यांच्यावतीने टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत पुणे विभागातील अहिल्यानगर जिल्ह्यातील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय राहुरी कृषी विद्यापीठ या संघाने उत्कृष्ट कामगिरी करून आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन उपविजेतेपद पटकाविले. संघातील खेळाडूंचा विद्यालयाचे प्राचार्य अरुण तुपविहीरे, उपप्राचार्य बाळासाहेब डोंगरे व पर्यवेक्षक मनोज बावा यांनी सत्कार करुन त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

नाशिक विभागाचा पराभव करून सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाच्या अहिल्यानगर संघाने अंतिम फेरीत धडक मारली होती. अमरावती संघाबरोबर झालेल्या अंतिम सामन्यात पराभव पत्कारावा लागला. हा संघ पुणे विभागातून सोलापूर, पुणे शहर, पुणे ग्रामीण, पिंपरी चिंचवड या संघाचा पराभव करून राज्य स्पर्धेसाठी पात्र ठरला होता.

सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाच्या अहिल्यानगर संघात सिमरन शेख (कर्णधार), वृषाली पारधे, ऐश्वर्या चौरसिया, संतोषी भिसे, मृणाल ननवरे, धनश्री पवार, नशरा सय्यद, धनश्री शेडगे, तनिष्का मगर, राशी पवार, प्रणाली पानसंबळ या खेळाडूंचा समावेश होता. सदर खेळाडूंना क्रीडा शिक्षक घन:श्याम सानप, संतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

विजेच्या संघाचे सावित्रीबाई फुले शिक्षण मंडळाचे सचिव महानंद माने, सभापती प्रमोद रसाळ, खजिनदार महेश घाडगे आदींसह सर्व शालेय शिक्षक व कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



महानगरपालिका अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी आयोजित तिसऱ्या वर्षीच्या क्रिकेट क्रीडा स्पर्धेमध्ये मुख्य प्रशासकीय कार्यालय संघ विजेता ठरला. (छाया – लहू दळवी)

# अहिल्यानगर महानगरपालिका अधिकारी कर्मचारी क्रिकेट स्पर्धेत मुख्य प्रशासकीय कार्यालय संघ विजेता

नगर – महानगरपालिका अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी आयोजित तिसऱ्या वर्षीच्या क्रिकेट क्रीडा स्पर्धेमध्ये मुख्य प्रशासकीय कार्यालय संघ विजेता ठरला. त्यांनी ८ षटकात ९९ धावांचे आव्हान प्रभाग समिती कार्यालय १ यांच्यासमोर ठेवले होते. त्यांनी ८ षटकात ६४ धावापर्यंत मजल मारू शकले. या स्पर्धेमध्ये एकूण ८ संघ सहभागी झाले होते. अंतिम सामन्यात सोनू चौधरी यांनी सलग ३ विकेट घेऊन हॅट्रिक घेत संपूर्ण सामन्यामध्ये ७ विकेट घेतले. याचबरोबर सुरज दहीहंडे या कर्मचाऱ्याने ३० बॉलमध्ये १०० धावा केल्या, तसेच ३ षटकार देखील मारले. योगेश पंडित या कर्मचाऱ्यांनी सलग ४ चौकार मारले असून या क्रिकेट सामन्यांचा अधिकारी कर्मचारी यांनी आनंद घेतला.

मागील वर्षीच्या प्रभाग समिती क्रमांक १ च्या गत विजेत्या संघाला प्रशासकीय मुख्य कार्यालय संघाने हरविले. यावेळी मनपा कर्मचारी अनिल लोखंडे यांनी समालोचन करत प्रेक्षकांची मने जिंकली.

# वाहतुकीचे नियम समजण्यासाठी शाळा तेथे आरएसपी युनिटची स्थापना आवश्यक

## अशोक कडूस यांचे प्रतिपादन; उद्बोधन शिबिरात आरएसपी विभागाच्या कार्याचे महत्त्व स्पष्ट, वाहतूक सुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापनावर चर्चा



जि.प. माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांनी वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षण विभागाच्या वतीने अहिल्यानगर येथील रेसिडेन्शिअल ज्युनिअर कॉलेजमध्ये एक दिवसीय उद्बोधन शिबिर पार पडले.

नगर – प्रत्येक शाळेमध्ये आरएसपी युनिट असावे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना वाहतूक नियम आणि त्यांचे महत्त्व शिकवता येईल, जि.प. माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांनी वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षण विभागाच्या वतीने अहिल्यानगर येथील रेसिडेन्शिअल ज्युनिअर कॉलेजमध्ये एक दिवसीय उद्बोधन शिबिर पार पडले. लेखाधिकारी तथा आरएसपीचे मार्गदर्शक मनोज शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रम प्रसंगी आरटीओ अधिकारी प्रियंका उनवणे, शहर वाहतूक विभागाचे बाबासाहेब बोरसे, रेसिडेन्शिअल विद्यालयाचे प्राचार्य विजय पोकळे यांची उपस्थिती होते.

नाशिक–नगरचे विभागीय समादेशक सिकंदर शेख यांनी आरएसपी विभागाच्या महत्त्वपूर्ण कार्याचे विवेचन करुन, रस्ते अपघात व नैसर्गिक आपत्ती वाहतूक कोंडी यासंदर्भात युवकांची जबाबदारी यावर मार्गदर्शन केले. तर आरएसपी विभागाच्या माध्यमातून सुरु असलेल्या समाज जागृतीच्या कार्याची माहिती दिली.

जिल्हा समादेशक सोमनाथ बोंतले यांनी अभ्यासक्रमामध्ये असणारे आरएसपी विभागाचे महत्त्व त्याचबरोबर निरनिराळ्या सण–उत्सवात आरएसपी विभाग वाहतूक शाखेला करत असलेल्या मदतीचा आढावा घेतला. यावेळी आरएसपी विभागाच्या नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. रेसिडेन्शिअल विद्यालयाचे प्राचार्य विजयकुमार पोकळे यांना कार्याध्यक्षपदावर नियुक्ती करण्यात आली. तसेच उपसमादेशकपदी प्रकाश मिंड, अतिरिक्त समादेशकपदी डोफे, जिल्हा कोषाध्यक्षपदी विनायक साळवे, तालुका समादेशकपदी राहुल जाधव (राहुरी), संदीप तारडे (श्रीरामपूर), एकनाथ लगड (नगर शहर), राजेंद्र धस (नगर तालुका), सुनिल दानवे (नेवासा), उर्हे (राहता), दत्तात्रेय घुले (अकोले), विकास सोनवणे (संगमनेर) यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या.

आरटीओ प्रियंका उनवणे म्हणाल्या, भविष्यकाळात दुचाकी वाहनांसाठी हेल्मेट वापरणे अनिवार्य आहे. भविष्यात सेन्सर हेल्मेट असावे हेल्मेट शिवाय दुचाकी स्टार्ट होऊ नये, याची गरज आहे. वाहतुकीचे नियम आपल्या सर्वांच्या हिताचे व संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा समादेशक सोमनाथ बोंतले यांनी सर्व शाळांमध्ये आरएसपी विभाग राबवण्याचे आवाहन केले आणि प्रत्येक शाळेमध्ये एक आरएसपी अधिकारी असणे गरजेचे असल्याचे सांगितले. मे महिन्यात प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपसमादेशक प्रकाश मिंड व अतिरिक्त समादेशक चंद्रकांत डोफे यांनी परिश्रम घेतले.

# शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सदस्य नोंदणीचा शुभारंभ

## पक्षाचे विचार शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी सदस्य नोंदणीचे नियोजन करा : आ.संग्राम जगताप



श्रीविशाल गणपती मंदिरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सदस्य नोंदणीचा शुभारंभ करण्यात आला. (छाया–लहू दळवी)

नगर – राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सदस्य नोंदणीचा शुभारंभ शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरामध्ये प्रातिनिधिक स्वरूपात फॉर्म ठेवून करण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली आपण काम करत असून सर्वांनी पक्ष संघटना वाढीसाठी मोठ्या प्रमाणात सदस्य नोंदणी करावी, पक्षाचे विचार शेवटच्या घटकापर्यंत घेऊन जाण्यासाठी विभागानुसार सदस्य नोंदणीचे नियोजन करावे आपण महायुती सरकारमध्ये काम करत आहे. काश्मीर भूमीतील पीओके शब्द पुसला पाहिजे आणि अखंड भारत निर्माण होण्यासाठी हिंदुत्वाची खरी गरज आहे. आपल्या हिंदू संस्कृतीमध्ये कुठलेही शुभ कार्य करायचे असेल धार्मिकतेपासून करावे लागते, शहराचे श्रद्धास्थान श्री विशाल गणपती मंदिरात सदस्य नोंदणीचा शुभारंभ केला असल्याचे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सदस्य नोंदणीचा शुभारंभ श्री विशाल गणपती मंदिरात आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाला. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, गणेश भोसले, अविनाश घुले, प्रा. माणिकराव विधाते, प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, संभाजी पवार, महिला जिल्हाध्यक्ष रेश्मा आठरे, कार्याध्यक्ष प्रा. अरविंद शिंदे, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुरेश बनसोडे, युवक अध्यक्ष इंजि. केतन क्षीरसागर, विद्यार्थी संघटनेचे शहर जिल्हाध्यक्ष वैभव ढाकणे, संतोष ढाकणे, दीपक खेडकर, शिवाजी साळवे, डॉ. रणजीत सत्रे, मळु गाडळकर, सतीश ढवण, भरत गारुडकर, विनीत गाडे, गणेश बोरुडे, आकाश दंडवते, रेणुका पुंड, मयुरी गोरे, संगीता अकोलकर, सुनंदा शिरवाळे, सुरेखा फुलपगारे, राणी भाकरे, अपर्णा पालवे, शालिनी राठोड, आरती उफाडे, सुनंदा कांबळे, मंजुषा शिरसाठ आदी उपस्थित होते

शहरामध्ये आ. संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्वजण पक्षाचे काम करत आहोत, आता महापालिकेत निवडणूक येणार असून या ठिकाणी महायुतीची सत्ता आणायची आहे, तरी कार्यकर्त्यांनी आपापल्या भागामध्ये सदस्य नोंदणी करावी, निवडणुकीमध्ये सदस्य नोंदणीचा विचार केला जाणार आहे. नगर शहराची राज्यामध्ये सर्वात जास्त सदस्य नोंदणी करणार असून एक लाखाचे उद्दिष्ट पूर्ण केले जाईल, अशी माहिती संपत बारस्कर यांनी दिली.



ओंकार कॉलनीमधील स्मॅश टेबल टेनिस ॲकॅडमी स्पर्धेतील पारितोषिक वितरण धनेश बोगावत यांच्या हस्ते झाले.

# खेळामुळे व्यक्तिमत्त्व विकास

## धनेश बोगावत यांचे प्रतिपादन; टेबल टेनिस स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण

नगर – खेळण्यामुळे चपळता वाढते, त्याचप्रमाणे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकासही घडतो. खेळताना जिंकण्याचे ध्येय जरूर असावे, तथापि फक्त जिंकण्यासाठी खेळू नका. त्यातून मिळणाऱ्या आनंदासाठी खेळत राहा. नेहमी खिलाडू वृत्तीने खेळ खेळावे, असे आवाहन माजी टेबल टेनिस खेळाडू व स्वीट होमचे संचालक धनेश बोगावत यांनी केले.

गुलमोहोर रोड, ओंकार कॉलनीमधील स्मॅश टेबल टेनिस ॲकॅडमी स्पर्धेतील पारितोषिक वितरण धनेश बोगावत यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून फिजिशियन डॉ. हरजितसिंह कथुरिया, ॲकॅडमीचे संचालक राजेश जहागीरदार, ओंकार भंडारी, निमिश सोरटूरकर, स्वप्निल करवंदे, प्रदीप जाधव आदी उपस्थित होते.

पुढे बोगावत म्हणाले की, खेळांमधे टेबल टेनिसला विशेष महत्त्व आहे. त्याचा सातत्याने सराव केल्यास नजर एकाग्र होते आणि बुध्दीही विकसित होत राहते. या खेळाने शारीरिक व मानसिक विकास साधला जातो. माझ्या काळात जे चॅम्पियन टेबल टेनिसपटू होते, त्यामधील बरेचसे यशस्वी आय.आय.टी.यन. झाले आहेत. या खेळाने बुद्ध्यांक वाढतो. टेबल टेनिससाठी चांगल्या व अद्ययावत साधनसामग्रीने स्मॅश ॲकॅडमी सुसज्ज आहे. त्यामुळे शहराच्या क्रीडा क्षेत्रात मोलाची भर पडत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विविध गटांमध्ये जनरल चॅम्पियनशिप पटकावणारे खेळाडू बिगिनर ग्रूप– निर्वी देवळालीकर, ज्युनिअर ग्रूप– साहिल करवंदे व सान्वी जाधव आणि व्हेटरन ग्रूप– राजेश जहागीरदार आणि इतर खेळाडूंना बोगावत यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.



शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम पृथ्वीक प्रताप व दत्तू मोरे यांनी भेट दिली असता त्यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी देवस्थानचे उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, विश्वस्त पांडूरंग नन्नवरे, बापूसाहेब एकाडे, रंगनाथ फुलसौंदर, विजय कोथिंबिरे, नितीन पुंड, गणेश राऊत आदी.




# केंद्रीय अर्थसंकल्पावर खुली चर्चा करण्यासाठी ११ फेब्रुवारीला नगरमध्ये परिसंवादाचे आयोजन

नगर – न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर (स्वायत्त) मधील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने ११ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता महाविद्यालयाच्या सेमिनार हॉल (ग्रंथालय इमारत) येथे संसदेत मांडलेल्या सन २०२५–२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पावर खुली चर्चा करण्यासाठी परिसंवादाचे आयोजन केलेले आहे.

या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे राहणार असुन तज्ञ व्याख्याते म्हणून डॉ. माधव शिंदे सहयोगी प्राध्यापक, अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर व सीए. (CA) प्रसाद भंडारी, माजी अध्यक्ष, WIRC of ICAI, शाखा– अहमदनगर यांना निमंत्रित केले आहे. हा कार्यक्रम अहमदनगर शहरातील सर्व नागरीक, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, सामाजिक व शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था, विविध संघटना, असोसिएशन इ. करीता खुला आहे. या परिसंवादास सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. बाळासाहेब सागडे व उपप्राचार्य कला शाखा समन्वयक डॉ. किसन अंबाडे यांनी केले आहे.

# दशकपूर्ती महोत्सवानिमित्त श्रुती संगीत निकेतनतर्फे १५ फेब्रुवारी रोजी ज्ञानेश्वर दुधाडे यांचे संतूर वादन, शेखर दरवडे यांचे स्वतंत्र तबला वादन

## १६ फेब्रुवारी रोजी डॉ. रुचिरा केदार आणि प्रा.निलेश खळीकर यांचे शास्त्रीय आणि उपशास्त्रीय गायनाचे आयोजन

नगर – श्रुती संगीत निकेतन आयोजित दशकपूर्ती महोत्सवानिमित्त चार दिग्गज कलाकारांची कला आपणांस अनुभवायला मिळणार आहे. १५ फेब्रुवारी रोजी ज्ञानेश्वर दुधाडे यांचे संतूर वादन आणि शेखर दरवडे यांचे स्वतंत्र तबला वादन तसेच १६ फेब्रुवारी रोजी डॉ.रुचिरा केदार आणि प्रा.निलेश खळीकर यांचे शास्त्रीय आणि उपशास्त्रीय गायन ऐकायला मिळणार आहे

शेखर दरवडे : तबल्यामधील नगरमधील एक नामवंत नाव, सतीश आचार्य आणि धनंजय खरवंडीकर यांच्या तालमीत यांचा तबला तयार झाला आहे. संगीताच्या कोणत्याही प्रकारात साथसंगत आणि सोलो अतिशय तयारीने सादर करतात. यांचे स्वतंत्र तबला वादन, संतूर वादन आणि गायनाबरोबर साथसंगत आपल्याला अनुभवायला मिळणार आहे.

ज्ञानेश्वर दुधाडे : नगरमधे डॉ.मधुसूदन बोपर्डीकर, रमेश कुकडे, सौ.स्मिता राणा, माणिककाका हाथीदारू, जितेंद्र रोकडे, महेश लेले असे हाताच्या बोटांवर मोजण्याइतके स्वर वाद्य वाजवणारे कलाकार झालेत. याच मांदियाळीतील एक अग्रगण्य नाव म्हणजे ज्ञानेश्वर दुधाडे. रावसाहेब दुधाडे यांचा समर्थ सांगीतिक वारसा लाभलेल्या श्री. ज्ञानेश्वर यांनी संतूर वादन पं.धनंजय दैठणकर यांच्याकडे शिकले. घराणेदार वादन करणाऱ्या या कलाकारांचे संतूर वादन आपणास ऐकायचे भाग्य लाभणार आहे.

प्रा.निलेश खळीकर : नगर मधे.. आपले गाणे तसेच न्यू आर्टस् कॉलेज आणि नगारा महोत्सव यां माध्यमांतून रसिकांसमोर आलेले एक अग्रगण्य नाव म्हणजे प्रा.निलेश खळीकर. पं. विजय कोपरकर, पं.विजय बक्षी यांसारख्या नामवंतांची तालीम लाभलेले प्रा. खळीकर यांचे गायन आपल्याला या महोत्सवात ऐकायला मिळणार आहे.

डॉ.रुचिरा केदार : या महोत्सवात पं.उल्हास कशाळकर यांच्या शिष्या डॉ.रुचिरा केदार आपले गायन सादर करणार आहेत. मधुर आवाज, घरंदाज तालीम आणि रागाची कलात्मक मांडणी ही वैशिष्ट्ये असलेल्या डॉ.केदार यांचे गायन यंदाच्या मानाच्या सवाई गंधर्व महोत्सवात सादर झाले होते. नगरकर रसिकांना त्यांचे गायन पूर्वी प्रा. खळीकर यांच्या माध्यमातून ऐकायला मिळाले होते. यावेळीही हा योग खळीकर सरांमुळेच प्राप्त होत आहे.

या महोत्सवात नगमा साथ किरण जोशी, हार्मोनियम साथ मकरंद खरवंडीकर आणि तबला साथ शेखर दरवडे करणार आहेत. निवेदन स्नेहल उपाध्ये आणि डॉ.हृषिकेश कुलकर्णी करणार आहेत.

१५ व १६ फेब्रुवारी रोजी सायं.६ वाजता पटवर्धन सभागृहात होणारा हा महोत्सव विनामूल्य असून, या महोत्सवास गुरुजन, विद्यार्थी वृंद, शिक्षक, रसिक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा डॉ. धनश्री खरवंडीकर, उपाध्यक्ष भूषण भणगे यांनी केले आहे.

# प्रत्येक आईने मुलीला माहेरसारखेंच सासरी रहाण्याचे ज्ञान द्यावे

## श्री राधाकृष्णजी महाराज यांचे प्रतिपादन

नगर – अलिकडच्या काळात सर्व सुखं मिळवण्याचा कल वाढत चालला असताना घरा–घरातील सहनशक्तीच संपू लागली आहे. कुटुंब व्यवस्था अबाधित रहाण्यासाठी सासरी जाणाऱ्या मुलीला आईने सहन करण्याचे शिक्षण देणे अत्यंत गरजेचे झाले आहे, असे प्रतिपादन श्री राधाकृष्णजी महाराज यांनी केले.

येथील श्री रामकृष्ण सेवा ट्रस्ट व्दारा अहिल्यानगरमध्ये प्रथमच आयोजित केलेल्या संत मीराबाई चरित्र कथा सोहळ्याचे पहिले पुष्प गुंफताना नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉनमध्ये ते बोलत होते. सनई चौघड्याच्या निनादात महाराजांचे कथास्थळी आगमन होत असताना सोबत कलश घेतलेल्या सुवासिनी होत्या. पुष्पवृष्टी करण्यात येत होती.



श्री रामकृष्ण सेवा ट्रस्ट व्दारा संत मीराबाई चरित्र कथा सोहळ्याचे पहिले पुष्प गुंफताना श्री राधाकृष्णजी महाराज दीपप्रज्वलन करताना.

ट्रस्टचे अध्यक्ष नंदलाल मणियार, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, सचिव सुरेश चांडक, खजिनदार मगनलाल पटेल, कथा सोहळ्याचे मुख्य यजमान रामनिवास इंदाणी, सतीशचंद्र इंदाणी, दैनिक यजमान श्रीगोपाल मणियार, पुरूषोत्तम पटेल, विजय झंवर, मधुसूदन सारडा तसेच हिरालाल पटेल, बजरंग दरक, डॉ.विजय भंडारी, लक्ष्मीनारायण जाजू, रामेश्वर बिहाणी, शरद झवर, सोमनाथ नजन, पुरुषोत्तम नावंदर, मुकुंद जाजू आदींच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करून महाराजांना सन्मानित करण्यात आले. पं.विजय मिश्रा यांनी पौरोहित्य केले. सूत्रसंचालन हर्षा गुजराथी यांनी केले.

स्वागतपर मनोगत व्यक्त करताना नंदलाल मणियार यांनी १९८३ सालापासून रामकृष्ण परिवार धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करत आहे. युवा आणि महिलांना सोबत घेऊन ट्रस्टचे कार्य शिस्तबध्दरितीने अखंडपणे सुरू आहे. राधाकृष्ण महाराजांच्या श्रीमुखातून संत मिराबाई चरित्र सलग तीन दिवस श्रवण करण्याचे भाग्य आपणा सर्वांना लाभले आहे. या कथा सोहळ्यात सहभागी झालेल्या सर्वांचे मी स्वागत करून अभिनंदन करतो, असे सांगितले.

राधाकृष्ण महाराज पुढे म्हणाले, सासरी मुलींनी अत्याचार, अनाचार सहन करू नये पण घरातील सर्वांना समजून घेऊन त्यांचे स्वभाव ध्यानी घेऊन कुटुंब जपण्याचा, सासरची मान उंचावण्याचा कसोशीने प्रयत्न करावा. प्रत्येक आईने आपल्या मुलीला सहन करण्याचे ज्ञान द्यावे. सासुरवाडीला जावयाला जसा मान मिळतो तसा सुनबाईला सासरी मान मिळाल्यास कुटुंब खऱ्या अर्थाने सुखी होतील. सुनबाईस सासरी जाताना आपल्या माहेरी चालल्यासारखा आनंद वाटला पाहिजे. मुलींनी गर्भ संस्काराचे महत्व अत्यंत सावधानतेने समजून घेतले पाहिजे. घरातील आजी–आजोबा संस्काराची खाण असतात. ज्या मुलांना आजी–आजोबा मिळतात ती मुले भाग्यशालीच असतात.

आज २०–२२ वर्षाचे युवक–युवती मनोरंजनास आनंद समजतात. खाणे–पिणे–मजा करणे, नवनवीन कपडे खरेदी करणे, दूरवर फिरायला जाणे, नाचणे हे त्यांना जीवन वाटते. जीवनाची अर्धी यात्रा पार करताना आपल्यास भगवंताने जीवन कशासाठी दिले? याचे भानही त्यांना नसते, ही वस्तुस्थिती आहे.

मिराबाईला बालपणीच भगवान श्रीकृष्णाला भेटण्याची आस लागली होती. ती बाल्यावस्थेत कथा कीर्तन श्रवण करायची म्हणून तिला भगवान श्रीकृष्णाच्या हृदयस्थानी स्थान मिळाले. आद्य शंकराचार्यांनी वयाच्या ३२ वर्षात धर्म रक्षण्यासाठी चार पीठ आणि विपुल ग्रंथ संपदा निर्माण केली. फार कमी लोकांना आपल्या जीवनाचे लक्ष्य समजते. संतांचे प्रेम–सान्निध्य सौभाग्यानेच प्राप्त होते. हनुमंताने आपल्या हृदयात प्रभू श्रीराम आहेत हे छाती फाडून दाखवून दिले तसे संत सावता माळी यांनी हृदयातील विठ्ठलाचे दर्शन घडवले, अशी भगवंताची भक्ती आपल्याला करता आली तर जीवनातील परमानंद मिळेल. जीवन सार्थकी होईल, असे राधाकृष्णजी महाराजांनी विविध दाखले देत सांगितले.

जब संत मिलन हो जाए । तेरी वाणी हरी गुण गाए ।। तब इतना समझ लेना । अब हरी से मिलन होगा ।। तसेच दूर नगरी बडी दूर नगरी । कैसे आऊ रे सावरीया तेरी गोकुलनगरी ।। या गीतासह मनात भरली पंढरी, जाईन म्हणते माहेरी, पांडुरंगाच्या दरबारी बाई हासत–नाचत या भावमधूर गीतांवर स्त्री–पुरुष भाविकांनी चांगलाच ठेका धरला. कथा सोहळ्याच्या पहिल्याच दिवशी स्त्री–पुरूषांची अलोट गर्दी झाल्याने श्री राधाकृष्ण सेवा ट्रस्टमधील सर्वांचा उत्साह द्विगुणीत झाल्याचे दिसून आले.

# अहिल्यानगरमध्ये १२ फेब्रुवारी रोजी पहिले ग्रामीण ख्रिस्ती साहित्य संमेलन

नगर – क्लेरा ब्रुस गर्ल्स हायस्कूल, स्टेशन रोड येथे १२ फेब्रुवारी रोजी पाहिले ग्रामीण ख्रिस्ती साहित्य संमेलन होत आहे. आजपर्यंत विविध मोठ्या शहरात साहित्य संमेलन झाली व होत आहेत. मात्र ग्रामीण भागातील ख्रिस्ती साहित्यिकांसाठी स्वतंत्र असे संमेलन कधीही झाले नाही. साहित्याचा उगमच मुळी ग्रामीण भागात झाला असे म्हणणे चूक होणार नाही. मात्र आपली वाङ्मयाची भूक भागवण्यासाठी ग्रामीण साहित्यिकाला स्वतंत्र व्यासपीठ नव्हते. या साहित्य संमेलनामुळे ते उपलब्ध होणार आहे. असे संमेलनाचे आयोजक विक्रम गायकवाड यांनी सांगितले.

या संमेलनाला मराठी ख्रिस्ती परिषदेचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक पौलस वाघमारे, परिषदेचे खजिनदार ॲड. विनायक पंडीत, फादर ज्यो. गायकवाड, देवदान कळकुंबे (प्रशासक, बुथ हॉस्पिटल), डॉ. रवी प्रभाकर (मराठी मिशन), पा. सुनील गंगावणे (विनियार्ड ब्लेसेड चर्च), अनिल भोसले (अध्यक्ष ख्रिस्ती विकास परिषद), कांतीश तेलोरे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

संमेलनाच्या स्वागताध्यक्षा डॉ. विजया जाधव, संमेलन अध्यक्ष जॉर्ज क्षेत्रे, तर संमेलनाचे उद्घाटक एस.के आल्हाट (मराठी मिशन), व साहित्यिक व कवी सायमन मार्टीन हे असणार आहेत.

सकाळी ग्रंथ दिंडीपासून कार्यक्रमाला सुरुवात होईल. सायंकाळी साहित्यिकांच्या सत्काराने कार्यक्रमाची सांगता होईल. साहित्य रसिकांनी या संमेलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सदर साहित्य संमेलन हे पहिलेच वर्ष असल्यामुळे एकदिवसीय होणार असल्याचे संमेलनाचे आयोजक विक्रम गायकवाड यांनी सांगितले.

# कोतवाल पदभरतीकरीता श्रीगोंदा येथे ११ फेब्रुवारी रोजी 'आरक्षण सोडत'

नगर – श्रीगोंदा तालुक्यातील कोतवालांची २० पदांसाठी प्रवर्ग निहाय आरक्षण सजेनिहाय देणे आणि महिला आरक्षण निश्चित करण्यासाठी ११ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता तहसिल कार्यालय श्रीगोंदा येथील सभागृहात उपविभागीय अधिकारी श्रीगोंदा–पारनेर यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे.

कोतवाल पदभरती सन २०२५ करिता जिल्ह्यातील सर्व तालुक्यात एकसुत्रता असावी म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी सूचना दिल्या आहेत. रिक्त पदांच्या ८० टक्क्यांच्या मर्यादेत पदे भरावयाची आहेत. श्रीगोंदा तालुक्यातील कोतवालांची एकूण २५ पदे रिक्त असून ८० टक्क्यांच्या मर्यादेत अज १, भज १, भजड १, इमाव ६, साशैमाप्र २, अधिघ २, अराखीव ७ अशी एकूण २० पदे भरावयाची आहेत.

अजनुज, पिसोरे बुद्रुक, येळपणे, वेळू, पेडगाव, मदेवडगाव, काष्टी, बेलवंडी बु, लोणी व्यंकनाथ, पांढरेवाडी, कोकणगाव, राजापूर, लिंपणगाव, बनपिंप्री, चिंभळा, चांडगाव, खांडगाव, बाबुर्डी, भानगाव आणि सुरोडी या तलाठी सजात कोतवाल पद रिक्त आहे. समांतर आरक्षण हे फक्त महिला प्रवर्गाकरीता लागू राहील. श्रीगोंदा तालुक्यातील कोतवाल पद प्रथम रिक्त झालेल्या २० गावांची निवड प्रवर्गनिहाय आरक्षण सोडतीसाठी ठेवण्यात आल्याचे तहसीलदार श्रीगोंदा यांनी कळविले आहे.

# परसबाग निर्मिती स्पर्धेत मनपा ओंकारनगर शाळा अहिल्यानगरमधून प्रथम

## अहिल्यानगर शहरातील १३५ शाळांचा सहभाग

नगर – प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अंतर्गत शालेय परसबाग निर्मिती स्पर्धेत महापालिका प्राथमिक शाळा ओंकारनगर केडगाव अहिल्यानगर शाळेला अहिल्यानगर शहरातून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. शहरातील १३५ शाळा या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. शाळेला प्रथम क्रमांकाचे ७५०० रुपये पारितोषिक प्राप्त झाले आहे. मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी सहशिक्षक शिवराज वाघमारे, सहशिक्षिका वृषाली गावडे व शाळेतील विद्यार्थी यांच्या मदतीने गेल्या १० वर्षांपासून शाळेत परसबाग फुलवली आहे. यासाठी सहज फाउंडेशन अहिल्यानगर, रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर मिडटाऊन, लायन्स क्लब ऑफ अहिल्यानगर मिलेनियम यांचेही सहकार्य मिळाले आहे.



परसबाग निर्मिती स्पर्धेत मनपा ओंकारनगर शाळा अहिल्यानगर शहरातून प्रथम आली आहे.

शाळेत शेवगा, कढीपत्ता, लिंबू, वांगी, मिरची, टोमॅटो, कोबी, फ्लॉवर, कोथिंबीर, भोपळा, विविध फळझाडे, विविध औषधी वनस्पती, विविध फुलझाडे यांची लागवड विद्यार्थ्यांच्या मदतीने करण्यात आलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना विविध रोपांची व झाडांची माहिती प्रत्यक्षपणे मिळाली आहे. तसेच जल व्यवस्थापन, कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प, इको क्लब उपक्रम, पर्यावरणविषयक जागृती इत्यादी उपक्रम शाळेत राबविण्यात येतात. तसेच परसबागेतून मिळणाऱ्या भाज्या शालेय पोषण आहारासाठी वापरल्या जातात. तसेच विद्यार्थी शाळेतील विविध फळांचा आस्वाद घेतात.

ओंकारनगर शाळेला अहिल्यानगर महानगरपालिका शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण, शालेय पोषण आहार समन्वयक ज्ञानेश्वर कुटे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले आहे. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा प्रियंका लोळगे, उपाध्यक्षा दिपाली साळवे, सदस्य कवित वाघमारे, गणेश पाडळे, पल्लवी भुजबळ, दुर्गा घेवारे, पुनम बडे, भावना पवार, शिलाबाई देसाई, हेमंत झरेकर यांनी शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

ओंकारनगर शाळेत मागील दहा वर्षांपासून शालेय परसबाग निर्माण करण्यात आलेली आहे. या परसबागेतील भाजीपाला शालेय पोषण आहारासाठी वापरला जातो. तसेच शाळेतील सिताफळ, पेरु, आंबा, रामफळ ही फळे विद्यार्थ्यांना देण्यात येतात. शाळेतील भाजीपाला विद्यार्थी बाल आनंद मेळाव्यात विक्री करतात व खरेदी– विक्रीचा अनुभव घेतात. भाऊसाहेब कबाडी – मुख्याध्यापक.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या केडगाव येथील ओंकारनगर प्राथमिक शाळेत सातत्याने नवनवीन उपक्रम राबवले जातात. तसेच शाळा विविध स्पर्धांमध्ये सातत्याने सहभागी होते. शालेय परसबाग निर्मिती स्पर्धेत ओंकारनगर शाळेने मिळवलेल्या यशाबद्दल शाळेतील शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन. जुबेर पठाण – प्रशासनाधिकारी मनपा शिक्षण विभाग अहिल्यानगर.

# समाजसेवक अविनाश देडगावकर यांनी एका अनोळखी पुरुषाला जीवनदान दिले

नगर – शहरातील उड्डाण पुलावर असहाय्य आजारी अनोळखी पुरुषाला तातडीने वैद्यकीय उपचार देऊन त्यांचे प्राण वाचवले. ही घटना ०७/०२/२०२५ रोजी दु. १२ ते १२:३० दरम्यान ही घटना घडली.



चांदणी चौकात वाहतुकीची गर्दी वाढली होती. वाहतुक सुरळीत करण्याचे काम समाजसेवक अविनाश देडगांवकर करत होते. त्यावेळेस एक दुचाकीस्वार यांनी श्री. देडगांवकर यांना सांगितले की, चांदणी चौकात उड्डाणपुलावर एक पुरुष झोपलेला आहे. एखाद्या वाहनाखाली येऊन अपघात होण्याचा धोका आहे. ती माहिती मिळताच देडगांवकर तत्काळ उड्डाण पुलावर गेले. त्यांनी आजारी व्यक्तीची परस्थिती पाहिली असता. त्या इसमास निट बोलता येत नव्हते. तो अस्पष्ट बोलत होता. त्याला नीट चालताही, बसताही येत नव्हते आणि उभेही राहता येत नव्हते. एका रिक्षावाल्याला बोलून त्या व्यक्तीला चांदणी चौकात आणले. त्याला थोडे खायला व चहापाणी दिले. शहर वाहतूक शाखेच्या महिला पोलीस रुपाली इंगळे यांच्या सहकार्याने ह्या घटनेची माहिती अहिल्यानगर पोलीस कंट्रोल रूमला दिली. श्री. देडगांवकरांनी रुग्णवाहिका बोलून त्या इसमाला जिल्हा रुग्णालयात दाखल केले. त्याला वेळेतच वैद्यकीय उपचार मिळाल्याने त्याचे प्राण वाचले. सबंधित व्यक्ती हा अनाथ आहे. समाजसेवक अविनाश देडगांवकर यांच्यामुळे त्याचे प्राण वाचले.

# शिव–शंभूच्या जयकारात धारकरी मोहिमेला रवाना

नगर – छत्रपती शिवाजी महाराज व धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जय जयकारात अहिल्यानगर येथील धारकऱ्यांनी मोहिमेसाठी रायगडाकडे नुकतेच प्रस्थान ठेवले. अहिल्यानगर शहर, उपनगर व जिल्ह्यातील धारकरी यामध्ये सहभागी झाले आहेत.



छत्रपती शिवाजी महाराज व धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जय जयकारात अहिल्यानगर येथील धारकऱ्यांनी मोहिमेसाठी रायगडाकडे नुकतेच प्रस्थान ठेवले. (छाया – उदय जोशी)

संभाजी भिडे गुरुजी यांच्या प्रेरणेने दरवर्षी छत्रपती श्री शिवाजी महाराज, धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज व असंख्य अनामिक मावळ्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी, हिंदवी स्वराज्याला मानवंदना देण्यासाठी शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानतर्फे धारातीर्थ गडकोट मोहीम काढण्यात येते. यावर्षी रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील उमरठे या गावातील नरवीर तानाजीराव मालुसरे यांची परम पवित्र समाधी व हिंदवी स्वराज्याची राजधानी दुर्गराज रायगड येथील छत्रपती शिवाजी महाराजांची परम पवित्र समाधी येथे या मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरून या मोहिमेत धारकरी सहभागी होत असून अहिल्यानगर जिल्ह्यातून जिल्हा कार्यवाह बापू ठाणगे व तालुका कार्यवाह संदीप खामकर यांच्या नेतृत्वात असंख्य धारकरी या मोहिमेत सहभागी झाले आहेत. अहिल्यानगर शहर, उपनगर व आजूबाजूच्या तालुक्यातील धारकऱ्यांनी नुकतेच या मोहिमेकडे प्रस्थान ठेवले.

प्रारंभी माळीवाडा बसस्थानक परिसरातील शिवछत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्याला वंदन करून ध्येयमंत्र व प्रेरणा मंत्र म्हणून शिवछत्रपती व संभाजी महाराजांचा आई तुळजाभवानीचा मोठ्या जल्लोषात जयजयकार करण्यात आला. धारकरी नरेंद्र दातीर, नागेश जाधव, वैभव तोडमल, दिनेश तोडमल, भाऊसाहेब जाधव, अजय शेळके, संकेत वागस्कर, तुषार जगताप, अजिंक्य खांदवे, अनिकेत बनकर, शिवम शेडाळे, जालिंदर उकिरडे, अनिल हिंगे यांच्यासह धारकरी सहभागी झाले आहेत.

# पिकते तिथे विकत नाही या म्हणीचा अनुभव आपल्याला नेहमी येत असतो

अहिल्यानगर मधील कला दृष्टी असलेले एक टेक्नोलिगल कन्सल्टंट व इंजिनिअर सुहास मुळे यांची महाबळेश्वर मेटगुताड विकास समितीवर सल्लागार सदस्य म्हणून निवड झाली आणि त्यांनी वर्षभरात तेथील दुर्लक्षित परिसराचा इतका सुंदर विकास केला की ज्या नैसर्गिक सौंदर्य लाभलेल्या जागांकडे आजपर्यंत कुणाचं लक्षही गेलं नाही. अशा जागा निवडून त्या ठिकाणी नंदनवन फुलवण्याचे काम मेटगुताड येथील सरपंच व सर्व सदस्य, कायनेटिकचे अजिंक्य फिरोदिया, पद्मश्री अरुण फिरोदिया, जयश्री फिरोदिया, श्री. गुळवे यांच्या मदतीने कलात्मक मार्गदर्शनाखाली केले. त्यामुळे महाबळेश्वर मेटगुताड ग्रामपंचायतीला दररोज भरघोस उत्पन्नाचे साधन सुरु झाले आहे.



सुहास मुळे यांचा सत्कार करताना मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील, महाबळेश्वरचे नगराध्यक्ष डी. एम. बावळेकर, सरपंच महादेव ओंबळे व इतर सदस्य. महाबळेश्वर मेट गुताडमध्ये केलेला स्वच्छ तलाव आणि पायडल बोटग.

तेथील ग्रामदैवत कुंभळजाई देवी मंदिराचा परिसर तर एखाद्या तीर्थक्षेत्राला लाजवेल इतका स्वच्छ सुंदर आणि निसर्गरम्य विकसित झाला आहे.

संपूर्ण परिसर सोलर लाईट मुळे उजळून निघाला आहे, तसेच लिंगमळा येथील अमरधाम परिसर दुर्गंधीयुक्त कचरा युक्त आणि अतिशय दुर्लक्षित होता तिथे जवळच वाहणाऱ्या ओढ्याला बंधारा घालून छोटासा स्वच्छ तलाव तयार केला आणि त्यावर विहार करण्यासाठी प्रदुषण विरहित नवीन प्रकारच्या पायडल बोट देखील उपलब्ध झाल्या आहेत., छोटे छोटे धबधबे सुरक्षित करून त्याखाली बसण्याची देखील व्यवस्था केली आहे., सर्व बाजूंनी डोंगर दरीने वेढलेला हा परिसर ..पावसाळ्यामध्ये हे दृश्य इतके निसर्गरम्य असते की जणू काही आपण स्वित्झर्लंडमध्ये आलो आहोत की काय असे वाटते..

बाजूच्या दरीवर रोपवे उभारून त्याचाही आनंद पर्यटकांना घेता येतो आहे. तीनशे फूट खोल दरीतून वेण्णा नदी खळखळ वाहते ते दृश्य अप्रतिम वाटते. एका उंच टोकावर एक सेल्फी पॉईंट तयार केला असून त्याला जयश्री फिरोदिया सेल्फी पॉईंट असे नाव देण्यात आले आहे.

हा विकास करण्यासाठी अहिल्यानगर येथील कायनेटिक उद्योग समूह ने भरघोस आर्थिक मदत केली तसेच पुण्याचे रांका ज्वेलर, स्थानिक मॅप्रो यांच्याकडूनही मदत उपलब्ध झाली. तेथील सरपंच महादेव ओंबळे, भुकन गुरुजी, यांनी खरोखर अहोरात्र मेहनत घेऊन सुहास मुळे यांच्या तांत्रिक कायदेशीर आणि आर्थिक नियोजन मार्गदर्शनाचा लाभ संपूर्ण परिसराला देऊन पर्यटनाचे नवीनच पॉईंट विकसित केले.

महाबळेश्वरच्या अलीकडे पाच किलोमीटरवर असलेल्या मेटगुताड या परिसराचा एकदम कायापालट झाला. या सर्व गोष्टींची दखल घेऊन तेथील मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील तसेच महाबळेश्वरचे नगराध्यक्ष डी एम बावळेकर, सरपंच महादेव ओंबळे, व सर्व सदस्य तसेच, प्रकाश शिंदे, सुनील कुलकर्णी, योगेश गणगले व हजारो ग्रामस्थांच्या उपस्थितीमध्ये कुंभळजाई देवीची जत्रा झाली. हा सोहळा रात्री तीन वाजेपर्यंत चालू होता. त्यामध्ये एका कार्यक्रमामध्ये सुहास मुळे यांचा मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंदआबा पाटील यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. त्यावेळी या मकरंद आबा पाटील यांनी सुहास मुळे यांच्या कार्याचा गौरव केला.

तेथील वर्षभरात त्यांनी केलेल्या विकासाबद्दल नवा मराठाशी बोलताना सुहास मुळे यांनी आपल्या अहिल्यानगर मधे दृष्टिकोन आणि बुद्धिमत्ता असलेल्या प्रामाणिक कार्यक्षम व्यक्ती, निधी, जागा सगळं उपलब्ध असूनही लोकप्रतिनिधींचा आणि नागरिकांची ही मानसिकता आणि इच्छाशक्ती नसल्यामुळे असा विकास होऊ शकत नाही, नुसत्या कोटीच्या कोटी घोषणा होतात. सीना नदी एक मोठी गटारच म्हणूनच राहते आणि ऐतिहासिक परिसर हा कुठलाही नेत्र दीपक पर्यटकांना आकर्षित करणारा विकास न होता फक्त खंडर ऐतिहासिकच राहतो, अशी खंत व्यक्त केली.

# ज्ञानसंपदा शाळेत आंतरशालेय फॅन्सी ड्रेस स्पर्धेत मुलांनी दिले

## भारतीय पक्वान्न, सुकामेवा, मसाले यांची माहिती, विविध वेषात मुलांनी वेधले पालकांचे लक्ष

नगर – लहान मुलांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागावा या हेतूने ज्ञानसंपदा शाळेत फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. उत्साहपूर्ण वातावरणात या स्पर्धा झाल्या. या स्पर्धेसाठी नर्सरी वर्गाला सुकामेवा (ड्रायफ्रूट्स), एल. के. जी. साठी भारतीय पक्वान्न (इंडियन स्वीट्स) तर यु. के. जी. वर्गाला मसाले (स्पायसेस) असे विविध विषय देण्यात आले होते. या स्पर्धे साठी परिसरातील अनेक शाळांनी सहभाग नोंदवला.




ज्ञानसंपदा शाळेत फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी नर्सरी वर्गाला सुकामेवा (ड्रायफ्रूट्स), एल के जी साठी भारतीय पक्वान्न (इंडियन स्वीट्स) तर यु के जी वर्गाला मसाले (स्पायसेस) असे विविध विषय देण्यात आले होते. (छाया– उदय जोशी)

स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सौ. नम्रता जगताप, कु.सेजल पोटे, कु.श्रुतिका आढाव यांनी काम पाहिले.

स्पर्धेचे विजेते – नर्सरी – सानवी जटाव (प्रथम ज्ञानसंपदा स्कूल), अथर्व गर्जे (द्वितीय गुरुकुल स्कूल) नताली थोलार (तृतीय सनबीम स्कूल),

एल.के.जी – आज्ञा कुलकर्णी (प्रथम ज्ञानसंपदा स्कूल) यशवर्धन सुद्रिक, रिदान अडसुरे (द्वितीय सनबीम स्कूल), शुभ्रा वाकळे (तृतीय ज्ञानसंपदा स्कूल)

युकेजी – वृद्धी शिंदे, (न्यू आयडियल स्कूल), अक्सा शेख (सनबीम स्कूल) (प्रथम), राघव कर्डिले (द्वितीय ज्ञानसंपदा स्कूल), राजवीर ओहोळ (तृतीय ज्ञानसंपदा स्कूल)

विजेत्या मुलांना लगेचच बक्षीस वितरण करण्यात आले. यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. शिवांजली अकोलकर, पूर्व प्राथमिक विभागाच्या समन्वयक मुक्ता दिवेकर यांनी मार्गदर्शन केले. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन सौ. सीमा कासार यांनी केले. परिचय व आभार सौ. राखी शिर्के यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# अर्थजगत

## घुसळण आणखी वाढणार?

**डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयांमुळे निर्माण झालेली जागतिक पातळीवरील अस्थिरता, रुपयात होणारी घसरण, देशांतर्गत कंपन्यांचे संमिश्र तिमाही निकाल यांमुळे भारतीय शेअर बाजाराच्या निर्देशांकांना वरच्या पातळीवर स्थिरावण्यात अडचणीत येत आहेत. गेल्या आठवड्यात अर्थसंकल्पातून आयकर मर्यादावाढीचा बूस्टर मिळाल्यानंतर आरबीआयच्या व्याजदरकपातीचा निर्णय झाला; पण तरीही या दिवशी बाजारात घसरण पहायला मिळाली. चालू आठवड्यात संसदेत सादर होणारे आयकर विधेयक, पंतप्रधानांचा संभाव्य अमेरिका दौरा, दिल्लीतील दिग्वीजय यांसारख्या घडामोडींचा बाजारावर प्रभाव राहील.**

भारतीय शेअर बाजारासाठी मावळलेल्या सप्ताहामध्ये दोन मोठ्या घटनांचा प्रभाव दिसून आला. पहिली घटना म्हणजे देशाचा अर्थसंकल्प आणि दुसरी म्हणजे रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीने २०२० नंतर पहिल्यांदाच केलेली व्याजदर कपात. याखेरीज संमिश्र तिमाही निकाल, विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांचा सततचा विक्रीचा मारा, अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची अनिश्चित टॅरिफ धोरणे यांचाही प्रभाव बाजारावर राहिला. या सर्वांमुळे गेल्या आठवड्यात बाजारात अस्थिरता दिसून आली. अशा अस्थिर काळातही बीएसई स्मॉलकॅप निर्देशांक किरकोळ वाढीसह बंद झाला आणि त्याने ४ आठवड्यांच्या तोट्याचा सिलसिला तोडला. दुसरीकडे, बीएसई मिडकॅप आणि लार्जकॅप निर्देशांकातही सलग दुसऱ्या आठवड्यात वाढ दिसून आली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक -सेन्सेक्समध्ये



३५४.२३ अंकांची म्हणजेच ०.४५ टक्क्यांनी वाढून ७७,८६०.१९ वर बंद झाला. दुसरीकडे निफ्टी- ५० निर्देशांक ७७.८ अंकांनी म्हणजेच ०.३३ टक्क्यांनी वाढून २३,५५९.९५ वर बंद झाला. असे असले तरी बीएसई एफएमसीजी निर्देशांक ५ टक्क्यांनी, बीएसई रियल्टी निर्देशांक ३.५ टक्क्यांनी, बीएसई कॅपिटल गुड्स निर्देशांक २.४ टक्क्यांनी आणि बीएसई पॉवर निर्देशांक जवळपास २ टक्क्यांनी घसरल्याचे दिसून आले.

**• अर्थव्यवस्था**

याउलट आरोग्यक्षेत्र, धातू व खनिज क्षेत्र, आयटी क्षेत्र यांमधील कंपन्यांच्या समभागांत चांगली तेजी दिसून आल्यामुळे या क्षेत्रांचे निर्देशांक २ ते ३ टक्क्यांनी वधारले.

७ फेब्रुवारी रोजी संपलेल्या आठवड्यात विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारात ८८५२.३१ कोटी रुपयांची विक्री केली. तर डीआयआयकडून ६४४९.६७ कोटी रुपयांची खरेदी करण्यात आली. गेल्या आठवड्यात भारतीय रुपयाने ८७.५९ या नवीन विक्रमी नीचांकी पातळी गाठल्याचे दिसले. विशेषतः रिझर्व्ह बँकेने रेपोदरात कपात केली ७ फेब्रुवारी रोजी रुपया ८१ पैशांनी कमजोर झाला आणि डॉलरच्या तुलनेत ८७.४२ रुपयांवर बंद झाला. तर ३१ जानेवारी रोजी डॉलरच्या तुलनेत रुपया ८६.६१ च्या पातळीवर बंद झाला होता.

खरे पाहता, अर्थसंकल्पामध्ये १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्याच्या निर्णयानंतर रिझर्व्ह बँकेने तब्बल पाच वर्षांनी व्याजदरात कपातीचा निर्णय घेणे या दोन्ही गोष्टी अर्थव्यवस्थेला जोरदार बूस्टर ठरणाऱ्या आहेत. असे असूनही शुक्रवारी सप्ताहसमाप्तीच्या दिवशी बाजारात मोठी घसरण पहावयास मिळाली. याचे मुख्य कारण विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून झालेला विक्रीचा मारा.

जानेवारी २०२५ मध्ये विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातून ८७,००० कोटी रुपयांहून अधिक पैसा काढून घेतला आहे. गेल्या तीन महिन्यांचा विचार करता एफआयआयनी १.७७ लाख कोटी रुपयांच्या समभागांची विक्री केली आहे.

आता वळूया चालू आठवड्याकडे. या आठवड्यात दिल्लीतील भारतीय जनता पक्षाचा विजय ही एक बाजारासाठी सकारात्मक घडामोड ठरू शकते. याखेरीज चालू आठवड्यात आयकराचे नवे विधेयकही संसदेत सादर होणार आहे.

तसेच पंतप्रधान मोदींचा अमेरिका दौरा या आठवड्यात सुरू होण्याची शक्यता आहे. या तिन्ही गोष्टी बाजारावर परिणाम करणाऱ्या आहेत. याखेरीज विदेशी गंगाजळीच्या साठ्यात गतसप्ताहात वाढ झाली आहे. भारताचा सुवर्णसाठाही वाढला आहे. तथापि, ट्रम्प यांच्या निर्णयांचा धडाका सातत्याने जगभरातील बाजारांवर परिणाम करत आहे.

शुक्रवारी अमेरिकन बाजार घसरणीने बंद झाले असून गिफ्ट निफ्टीमध्येही ८० अंकांची घसरण झाली आहे. याचा अर्थ सोमवारी भारतीय बाजाराची सुरुवात घसरणीने होण्याची शक्यता आहे. टेक्निकल चार्ट पाहिल्यास निफ्टी ५० साठी सद्यस्थितीत सोमवारची नीचांकी पातळी असणारा २३२५० हा भक्कम आधार आहे. या पातळीखाली गेल्यास २३ हजारांपर्यंत पुन्हा निफ्टी घसरू शकतो. वरच्या पातळीचा विचार केल्यास २३७०० आणि त्यानंतर २३८०० च्या पातळीवर अडथळा पातळी आहे. मजबूत खरेदीचा जोर दिसून आल्यास बाजारात तेजी दिसू शकते. परंतु वरच्या पातळीवर बाजार टिकत नसल्यामुळे तेजीच्या काळात नफावसुली करणे श्रेयस्कर ठरणारे आहे.

सद्यस्थितीत जागतिक पातळीवरील अस्थिरतेमुळे बाजारातील चढउतार सुरुच राहणार आहेत. हे लक्षात घेता दीर्घकालीन गुंतवणुकीच्या दृष्टीने विचार करुन चांगल्या समभागांमध्ये घसरणीचा लाभ घेता येईल. यामध्ये बँकिंग क्षेत्रातील दिग्गज कंपन्या, पायाभूत सुविधा, ऊर्जाक्षेत्र, रिअल इस्टेट कंपन्यांचा विचार नक्कीच करता येईल. यामध्ये एसबीआय, बँक ऑफ इंडिया, टाटा पॉवर, स्टार हेल्थ, झायडस वेलनेस, ब्रिटानिया, आयआरसीटीसी यांसह निफ्टी ५० मधील कंपन्यांची निवड फायदेशीर ठरेल. जागतिक पटलावरील अस्थिरता काही अंशी कमी झाली आणि मुख्यत्वेकरुन टेरिफ वॉरमधून भारताला वगळण्यावर शिक्कामोर्तब झाले तर भारतीय बाजार पुन्हा नवी भरारी घेऊ शकतात.

## एफआयआय विक्रीचा मारा का करताहेत?

*भारतीय शेअर बाजारात विदेशी गुंतवणूकदारांचा मोठा वाटा आहे. परंतु, अलीकडच्या काळात विदेशी गुंतवणूकदारांचं आउटगोईंग वाढलं आहे. केवळ जानेवारीबद्दल बोलायचे झाले तर, एनएसडीएलच्या आकडेवारीनुसार, विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी गेल्या महिन्यात बाजारातून ७७ हजार कोटी रुपयांची विक्री केली आहे. परदेशी गुंतवणूकदार आपला पैसा भारतीय बाजारातून काढून इतर देशांच्या बाजारात गुंतवत आहेत.*




जानेवारी २०२५ मध्ये विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातून ७७,००० कोटी रुपयांहून अधिकची विक्री केली आहे. गेल्या ३ महिन्यांत १.७७ लाख कोटी रुपये काढून घेण्यात आले आहे. तज्ज्ञांच्या मते, परकीय गुंतवणूकदारांचे प्राधान्य उच्च परतावा आहे. बाजारातील स्थिरता, तरलता आणि कराशी संबंधित गोष्टी पाहूनच विदेशी गुंतवणूकदार बाजारात गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतात.

गेल्या २० वर्षांत, निफ्टीने दरवर्षी सरासरी १४.५% परतावा दिला आहे, जो खूपच आकर्षक दिसत आहे. पण डॉलरमध्ये पाहिल्यावर तो नगण्य दिसतो. कारण २० वर्षांपूर्वी १ डॉलरची किंमत ४० रुपये होती. परंतु, आता त्याची किंमत ८७ रुपये आहे. म्हणजेच रुपयाचे मूल्य निम्म्याहून अधिक कमी झाले आहे. दुसरीकडे, FII डॉलरमध्ये गुंतवणूक करतात आणि डॉलरमध्येच पैसे काढतात, त्यामुळे या घसरणीचा त्यांच्या परताव्यावर परिणाम होतो. एफआयआयना डॉलरचा फायदा होतो, त्यामुळे रुपया घसरल्यावर ते पैसे काढून घेतात. कारण त्यांना तेवढा परतावा मिळत नाही.

रुपयाच्या घसरणीव्यतिरिक्त परकीय गुंतवणूकदारांची भारतात आणखी एक अडचण आहे. भारताची करप्रणाली. भारतात गुंतवणूक केल्यावर विदेशी गुंतवणूकदारांना १२.५ टक्के दीर्घकालीन लाभ कर (गेन टॅक्स) भरावा लागतो. त्याचबरोबर अमेरिकेत गुंतवणूक करताना त्यांना कोणताही कर भरावा लागणार नाही. आता नवीन आयकर कायद्यात यात बदल होणार का? हे पाहावे लागणार आहे. ◆◆◆

## रेपो दरातील कपातीने काय साधणार?

फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात सर्वसामान्यांसाठी दुहेरी आनंदाची बातमी आली आहे. एकीकडे, सरकारने अर्थसंकल्पात करात कपात करून दिलासा दिला, तर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने रेपो दरात ०.२५% (२५ बेसिस पॉईंट) कपात करण्याची घोषणा केल्यामुळे कर्ज स्वस्त होऊ शकते.

नवीन रेपो दरानुसार, तो ६.५% वरून ६.२५% पर्यंत कमी झाला आहे. हा निर्णय अशा वेळी घेण्यात आला आहे जेव्हा देशाचा आर्थिक विकास दर मंदावला होता आणि मागणी वाढवण्याची गरज भासू लागली होती. गेल्या पाच वर्षांतील ही पहिलीच वेळ आहे की रेपो दर ०.२५% ने कमी केला आहे, त्यामुळे ईएमआय, कार लोन आणि होम लोन स्वस्त होऊ शकतात. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्प २०२५ मध्ये आयकर सूट मर्यादा ₹ १२ लाख पर्यंत वाढवून मध्यमवर्गीयांना दिलासा दिला आहे. या निर्णयामुळे सरकारला सुमारे ₹१ लाख कोटींच्या कर महसुलाचे नुकसान होईल, परंतु लोकांना अधिक डिस्पोजेबल उत्पन्न मिळेल, त्यामुळे वापर आणि गुंतवणुकीला चालना मिळेल.

दुसरीकडे, आरबीआयने व्याजदरात कपात केल्याने गृहकर्ज, कार कर्ज आणि व्यावसायिक कर्जे स्वस्त होतील. यामुळे रिअल इस्टेट, ऑटोमोबाईल आणि इतर उद्योगांमध्ये मागणी वाढण्याची शक्यता आहे. दुसऱ्या तिमाहीत भारताचा जीडीपी वाढीचा दर ५.४% होता, परंतु सरकारने २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी तो ६.४% राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. दर कपातीमुळे हे लक्ष्य साध्य करण्यात मदत होईल, असा विश्वास आरबीआयच्या चलनविषयक धोरण समितीला आहे.

**● रेपो दर काय असतो?**
रेपो दर म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून व्यावसायिक बँकांना शॉर्ट-टर्म कर्ज देण्यावर लावलेला व्याज दर. हे व्याज दर बँकेच्या कर्जाची किंमती ठरवतात. जेव्हा बँका आरबीआय कडून कर्ज घेतात, तेव्हा त्या कर्जावर जो व्याज दर लागतो, त्याला रेपो दर म्हणतात.रेपो दर कमी करण्याचा उद्देश म्हणजे बँकांना अधिक स्वस्त कर्ज मिळवून, ते कर्ज इतर लोकांना, विशेषतः व्यावसायिक कर्ज आणि गृह कर्ज म्हणून दिले जावे.



**रेपो दर कमी केल्याने ईएमआय कमी कसा होतो?**
*जर रेपो दर ६.५०% वरून ६.२५% पर्यंत कमी झाला असेल, तर याचा अर्थ कर्ज देणाऱ्या बँकांना त्यांच्या कर्जावर कमीत कमी व्याजदर लागेल. त्यामुळे त्यांच्याही कर्जाच्या व्याज दरात कपात होईल. उदाहरणार्थ: तुम्ही १० लाख रुपयांचे घर कर्ज घेतले असेल आणि व्याज दर ६.५०% वर असेल, तर तुमच्या ईएमआयमध्ये एकाच महिन्यात काही रुपयांची कपात होऊ शकते, कारण बँकेचे कर्ज व्याज दर कमी झाला आहे. कमी ईएमआयमुळे कर्जदारांवरचा आर्थिक ताण कमी होतो.*

**● महागाई नियंत्रणात येईल का?**
आरबीआयचा अंदाज आहे की २०२५-२६ या आर्थिक वर्षात महागाईचा दर ४.२% वर राहील. अन्नधान्याच्या किमती घसरल्याने आणि स्थिर पुरवठा यामुळे महागाई नियंत्रणात राहण्याची शक्यता आहे. तथापि, आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमती आणि भू-राजकीय तणाव महागाईवर परिणाम करू शकतात. जागतिक स्तरावर जर मोठा धक्का बसला तर आरबीआयला आपल्या धोरणाचा पुनर्विचार करावा लागू शकतो. सरकार आणि आरबीआय यांची ही संयुक्त रणनीती विकासाला प्राधान्य देते. मात्र, त्याचा परिणाम हळूहळू दिसून येईल आणि ग्राहकांचा खर्च आणि गुंतवणूक किती वाढते यावर त्याचे यश अवलंबून असेल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.


**कोणत्या क्षेत्रांवर परिणाम?**
- **रिअल इस्टेट सेक्टर:** गृहकर्जाचे व्याजदर कमी होतील, त्यामुळे घर खरेदी करणाऱ्यांची संख्या वाढेल.
- **ऑटोमोबाईल क्षेत्र:** स्वस्त वाहन कर्जामुळे वाहन विक्रीला चालना मिळेल.
- **बँकिंग क्षेत्र:** बँकांची कर्ज वितरण क्षमता वाढेल. यामुळे आर्थिक बाजारपेठ मजबूत होईल.
- **एमएसएमई क्षेत्र:** लहान आणि मध्यम उद्योगांना कमी व्याजदरात कर्ज मिळेल, ज्यामुळे व्यवसायाचा विस्तार होईल.



## कागदपत्रांशिवाय प्रोफाइल अपडेट

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने आपल्या करोडो सदस्यांसाठी एक मोठे अपडेट जारी केले आहे. आता सदस्य कोणत्याही कागदपत्रांशिवाय त्यांचे वैयक्तिक तपशील सहजपणे दुरुस्त करू शकतात.

यामध्ये जन्मतारीख, नागरिकत्व, पालकांचे नाव, वैवाहिक स्थिती, जोडीदाराचे नाव, लिंग, कंपनी जॉइन करण्याची आणि सोडण्याची तारीख यासारख्या माहितीचा समावेश आहे. अपडेटसाठीच्या विनंत्या प्रलंबित असलेल्या ३.९ लाख सदस्यांना या बदलामुळे फायदा होईल. आता ते त्यांची प्रलंबित विनंती रद्द करू शकतात आणि नवीन आणि सोप्या प्रक्रियेअंतर्गत ती पुन्हा सबमिट करू शकतात.




ईपीएफओने आपल्या सिस्टीममध्ये अनेक अपडेट्स केले आहेत, जेणेकरुन आता सदस्य कोणत्याही कागदपत्रांशिवाय त्यांचे वैयक्तिक तपशील सहजपणे दुरुस्त करू शकतील. यामध्ये नावाचे स्पेलिंग, जन्मतारीख, पालकांची नावे, लिंग, वैवाहिक स्थिती, जोडीदाराचे नाव आणि कंपनीतून प्रवेश आणि बाहेर पडण्याची तारीख यासारख्या माहितीचा समावेश आहे. या नवीन अपडेटमुळे सदस्यांना त्यांची माहिती संपादित करणे सोपे होणार आहे. ईपीएफओने माहिती दिली की ही सुविधा फक्त त्या सदस्यांसाठी उपलब्ध आहे ज्यांचे युनिव्हर्सल अकाउंट नंबर आधारशी लिंक आणि सत्यापित आहे. तक्रारी कमी करणे आणि प्रलंबित विनंत्यांचे त्वरीत निराकरण करणे हा या प्रक्रियेचा उद्देश आहे. पूर्वी, बदलासाठी नियोक्त्याकडून पडताळणी आवश्यक होती, ज्यासाठी अंदाजे २८ दिवस लागत. आता या नवीन सुविधेमुळे सदस्यांना त्यांची माहिती सहज अपडेट करता येणार असून ही प्रक्रिया अधिक जलद आणि सोपी झाली आहे. यासाठी सर्व प्रथम सदस्यांना त्यांचे आधार कार्ड पॅनशी लिंक आहे की नाही हे सुनिश्चित करावे लागेल. लिंक नसेल तर आधी दोन्ही लिंक करणे आवश्यक आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अजूनही ५०% माहिती अपडेट करण्यासाठी ईपीएफओची मंजुरी आवश्यक असेल. उर्वरित माहिती सदस्य स्वत: अपडेट करू शकतात. वाढत्या तक्रारी कमी व्हाव्यात आणि त्यांचे निराकरण लवकर व्हावे यासाठी हे पाऊल उचलले जात आहे.

**कसे अपडेट करावे ?**
अपडेट करण्यासाठी, प्रथम ईपीएफओच्या वेबसाइटवर जा आणि तुमचा युएएन नंबर आणि पासवर्ड टाकून लॉग इन करा. त्यानंतर वरील 'मॅनेज' टॅबवर क्लिक करा. तुम्हाला नाव, जन्मतारीख किंवा लिंग यासारखी माहिती अपडेट करायची असल्यास, 'मूलभूत तपशील सुधारित करा' पर्याय निवडा. आधार कार्डानुसार योग्य माहिती भरा आणि लक्षात घ्या की ईपीएफ आणि आधारचा तपशील सारखाच असावा. आवश्यक असल्यास आधार, पॅन किंवा जन्म प्रमाणपत्र यांसारखी कागदपत्रे अपलोड करा.



## सरकारी बँकांचा कमाई विक्रम

आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या पहिल्या नऊ महिन्यांत सार्वजनिक क्षेत्रातील १२ बँकांचा निव्वळ नफा ३१.३ टक्क्यांनी वाढून १,२९,४२६ कोटी रुपये झालाय. या कालावधीतील हा आतापर्यंतचा सर्वाधिक निव्वळ नफा आहे.

अर्थमंत्रालयानं एका निवेदनात म्हटल्यानुसार आलोच्य कालावधीत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना एकूण २,२०,२४३ कोटी रुपयांचा ऑपरेटिंग नफा झाला. या बँकांची निव्वळ नफा वाढ आणि मालमत्तेची गुणवत्ता खूप चांगली आहे. त्याचबरोबर पुरेसा भांडवली बफर असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी वार्षिक आधारावर ११ टक्के व्यवसाय वृद्धी नोंदवली असून एकूण ठेवींमध्ये ९.८ टक्के वाढ झाली आहे. या कालावधीत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा एकूण व्यवसाय २४२.२७ लाख कोटी रुपयांवर पोहोचलाय. या बँकांनी १२.४ टक्के कर्ज वाढ नोंदविली. यामध्ये किरकोळ कर्जांमध्ये १६.६ टक्के, कृषी कर्जांमध्ये १२.९ टक्के आणि एमएसएमईच्या कर्जांमध्ये १२.५ टक्के वाढ झाली आहे.

कृषी, एमएसएमई आणि पायाभूत सुविधा क्षेत्रावर विशेष भर देत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचं पुरेसं भांडवल आहे आणि अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांच्या कर्जाची मागणी पूर्ण करण्यासाठी ते चांगल्या स्थितीत आहेत, असं मंत्रालयानं म्हटलंय. धोरणात्मक आणि प्रक्रियात्मक सुधारणांमुळे कर्जाची शिस्त, स्ट्रेस्ड असेट्सची ओळख आणि निराकरण, चांगलं प्रशासन, वित्तीय समावेशन उपक्रम आणि तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी चांगली प्रणाली विकसित झाली आहे, असं मंत्रालयानं म्हटलं आहे.



## टीडीएस सवलतीचा दिलासा

**ज्येष्ठ नागरिकांना बँकेच्या एफडीवर मिळणाऱ्या व्याजावरील टीडीएस कपातीची मर्यादा सरकारनं दुप्पट केल्यानं त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या या निर्णयामुळे ज्येष्ठ नागरिक योजना आणि बँक एफडीच्या माध्यमातून मिळणारं उत्पन्न दुप्पट होणार आहे.**

केंद्र सरकारनं ज्येष्ठ नागरिकांसाठी एफडी व्याजावरील टीडीएस कपातीची मर्यादा दुप्पट केली आहे. पूर्वी ती ५० हजार रुपये होती, ती आता १ लाख रुपये करण्यात आलीये. म्हणजेच व्याजातून एक लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर टीडीएस भरावा लागणार नाही. ही नवी मर्यादा १ एप्रिल २०२५-२६ पासून लागू होणार आहे. वास्तविक, बँका ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या एफडी योजनांवर सामान्य व्याजदरापेक्षा ०.५० टक्के अधिक व्याज देतात. अशा परिस्थितीत त्यांच्या कमाईत वाढ होईल. त्याचबरोबर पोस्ट ऑफिस ज्येष्ठ नागरिक बचत योजनेसारख्या लोकप्रिय योजनांमधील गुंतवणूक वाढण्याची शक्यता आहे.

सध्या ज्येष्ठ नागरिकांना बँक एफडीतून मिळणारं व्याज ५० हजार रुपयांपेक्षा अधिक असल्यास १० टक्के टीडीएस भरावा लागतो. तर १ एप्रिल २०२५ पासून १ लाख रुपयांपेक्षा जास्त व्याज उत्पन्नावर १०% टीडीएस भरावा लागेल.

सर्वसामान्य नागरिकांसाठी व्याज उत्पन्नावरील टीडीएस कपातीची मर्यादाही वाढवण्यात आली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात बिगर ज्येष्ठ नागरिकांसाठी एफडीवरील व्याजावरील टीडीएसची मर्यादा ५०,००० रुपये करण्यात आल्याचं म्हटलं होतं. जर तुमचं वार्षिक उत्पन्न करपात्र उत्पन्नापेक्षा कमी असेल तर तुम्ही तुमच्या इन्कम टॅक्स रिटर्नमध्ये टीडीएसचा दावा करू शकता.

त्याचबरोबर डिविडेंडच्या उत्पन्नावरील टीडीएस कपातीची मर्यादाही सरकारनं वाढवली आहे. यापूर्वी ही मर्यादा ५००० रुपये होती, तर अर्थसंकल्प २०२५ मध्ये ती वाढवून १० हजार रुपये करण्यात आली.

[illegible] किरकोळ



## सायबर गुन्हेगारीला लगाम बसणार?

अलीकडच्या काही वर्षांत सायबर गुन्हेगारीच्या घटनांमध्ये झपाट्याने वाढ होऊ लागली. काहीशे रुपयांपासून कोट्यावधींची बँक खाती काही मिनिटांत साफ केली जात आहेत. विविध उपाययोजना करुनही हे गुन्हे थांबायचं नाव घेताना दिसत नाही. आता कॉलरट्युनही अशा घटनांपासून सावध राहण्याचे आवाहन केलं जात आहे. मात्र, तरीही हे प्रकार थांबत नाहीयेत. हे लक्षात घेऊन आता सर्वसामान्यांची बँक खाती सुरक्षित करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने ठोस पाऊल उचलले आहे.

डिजिटल फसवणूक रोखण्यासाठी आरबीआयने बँका आणि नॉन-बँकिंग फायनान्स कंपन्यांना सायबर जोखमीशी संबंधित प्रणाली मजबूत करण्याचे आवाहन केले आहे. आरबीआय गव्हर्नर यांनी यासंदर्भात मत मांडताना असे म्हटले आहे की, सायबर गुन्हेगारीला सामोरे जाण्यासाठी कोणत्याही एका व्यक्तीचे प्रयत्न चालणार नाहीत, तर सर्व संबंधितांना या दिशेने एकत्रितपणे काम करावे लागेल.मध्यवर्ती बँक देखील आपल्या स्तरावर काही बदल करणार आहे, ज्याची अंमलबजावणी एप्रिलपासून केली जाईल. बहुतेक सायबर गुन्हेगार देशाबाहेरुन हे रॅकेट चालवत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे यापुढे देशाबाहेरील पेमेंटवर लक्ष ठेवण्यावरही आरबीआयने भर दिला. देशाच्या सीमेबाहेर केलेल्या कोणत्याही पेमेंटला सायबर फसवणुकीपासून संरक्षण देण्यासाठी त्यांनी द्वि-स्तरीय ऑथेंटिकेशनचा प्रस्ताव दिला आहे. याशिवाय गुंतवणूकदारांसाठी सरकारी रोख्यांमध्ये दीर्घकालीन गुंतवणुकीचा प्रस्तावही ठेवण्यात आला आहे. हे गुंतवणूकदारांच्या जोखमीचे योग्य व्यवस्थापन करू शकते.

**◆ फिन डॉट इन**
सायबर फसवणूक थांबवण्यासाठी बँकांचे डोमेन बदलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गव्हर्नर म्हणाले, की बँकांच्या वेबसाईटचे डोमेन बदलून त्यात एफआयएन डॉट इन जोडण्यात येणार आहे. यामुळे गुन्हेगारांना ग्राहकांच्या बँक खात्यांमध्ये प्रवेश करणे कठीण होईल. नवीन डोमेनची नोंदणी या वर्षी एप्रिलपासून सुरु होणार आहे. सर्वांनी एकत्र येऊन याविरोधात लढावी, अशी माझी इच्छा असल्याचे आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले.

**◆ बँकांसाठी स्वतंत्र इंटरनेट?**
बँकिंग विषयातील तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार सायबर फसवणूक रोखण्यासाठी आरबीआय एक नवीन इंटरनेट कंपनी स्थापन करण्याचा विचार करू शकते. ते म्हणाले की, सध्या बहुतांश सरकारी बँका बीएसएनएलच्या नेटवर्कवर चालतात, तर काही सुविधा एअरटेलच्या इंटरनेटवर उपलब्ध करून दिल्या जातात. सरकार बीएसएनएलला नवीन कंपनी किंवा सर्व्हर बनवून बँकांना इंटरनेट पुरवण्यास सांगू शकते.

## जागतिक संगीत महोत्सवात नगरचे पवन नाईक गाणार



नगर – येथील संगीत गायक, गुरू व अभ्यासक जागतिक संगीत महोत्सवात हजेरी लावणार. ४० वर फज्र आंतरराष्ट्रीय संगीत महोत्सव, तेहरान (ईराण) येथे आयोजित करण्यात आला आहे. ११ ते १७ फेब्रुवारी या ७ दिवसीय महोत्सवात पवन श्रीकांत नाईक यांना १३ व १४ फेब्रुवारी अशा दोन मैफलींसाठी विशेष निमंत्रित कलाकार म्हणून बोलाविले आहे.

संपूर्ण जगातील ५० ते ५५ देशांचा यात सहभाग असतो. पवन नाईक मैफलीत अरबी, फारसी, उर्दू, हिंदी व पंजाबी भाषेतील सूफी तत्त्वज्ञानाची गीते सादर करणार आहेत. अवा ए जमीन (Sound Of the Earth) या विशेष (इंडो – पर्शियन) कलावृंदासह हा नाईक यांच चौथा दौरा आहे. भारतातून उदय देशपांडे (तबला) व नेपाळयेथून अमानो मनीष (चतुरंगीणी) साथसंगत करतील.

ईराणमधील अवा ए जमीन चे सर्वेसर्वा वाहिद आईर्यान (गायक, संगीतकार व तंबूर वादक) हे आयोजन विशेष पुढाकार घेतात. सोबत मोज्तबा कलंतरी (सेतार व डफ) तसेच अली शेहबाजी, नासरीन अब्दुलवंद, सरीना अमरोल्लाही, लैला येकानी जादे, जाहरा गोजिरी, बेसिक शश्मिनी गीयाजवंद, मोहम्मदरेजा अलिजादे व अलीजादे रुस्तम हे सर्व पर्शियन कलाकार तंबूर साथ व सहगायन साथ देणार आहेत.

नाईक यांना मैफलीसाठी संगीत गुरू शुभलक्ष्मी गुणे, सुरेश साळवी, मधुसूदन बोपर्डीकर, रेवन्नाथ भनगडे, सतीश आचार्य, कुमुदिनी बोपर्डीकर, शुभांगी मांडे, वीणा कुलकर्णी, रघुनाथ केसकर, डॉ. शुभांगी बहुलीकर व डॉ. विकास कशाळकर तसेच सूफी व उर्दूसाठी ख़लिल मुजफ्फर, बशीर अहमद, डॉ. मुहम्मद आज़म, सूफी फैयाज़ अहमद, काकूजी व मौलाना असरार यांचे मार्गदर्शन लाभले.

# नगरमध्ये बांगलादेशी घुसखोरांना कागदोपत्री आश्रय देणाऱ्या सेतू चालकांवर कारवाई करावी

नगर – नगर शहरात अनेक सेतू केंद्रे हे जिहादी वृत्तीच्या सेतू चालकांकडे आहेत जे नगर शहरासह आजू बाजूच्या परिसरात बांगलादेशी रोहिंग्यांना कागदोपत्री आश्रय देत आहेत. त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी आ.संग्राम जगताप यांनी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.





शहरात बांगलादेशी घुसखोरांना विविध कागदपत्रे तयार करून देणाऱ्या सेतूचालकांवर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांना देताना आ. संग्राम जगताप व शिष्टमंडळ पहिल्या छायाचित्रात तर दुसऱ्या छायाचित्रात शहरातील बेकायदा बांधकामे, अतिक्रमणे तसेच बांगलादेशी रोहिंग्यांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी महापालिका आयुक्तांच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करताना आ. संग्राम जगताप यांच्यासह सकल हिंदू समाजाचे बांधव. (छाया – लहू दळवी)

या निवेदनात आ.जगताप यांनी म्हंटले आहे की, हे सेतू चालक या बांगलादेशी रोहिंग्यांना आधार कार्ड, मतदान कार्ड, पॅन कार्ड, ड्राइव्हिंग लायसेन्ससह रेशन कार्ड देखील काढून देत आहेत. ज्यात तहसील कार्यालयातील कर्मचारी वर्ग चिरीमिरीसाठी या सर्व कागदपत्रांना मंजुरी देत आहेत. हा सर्व प्रकार गंभीर असून आपण स्वतः यात जातीने लक्ष घालून बांगलादेशी रोहिंग्यांना कागदोपत्री आश्रय देणारे जे कोणी जिहादी वृतीचे सेतू चालक असतील अश्या सर्वांची कारवाई करून सेतू केंद्रे रद्द करावीत अशी मागणी त्यांनी केली आहे.

आपल्या देशात बांगलादेशी घुसखोरांची संख्या वाढली असून महाराष्ट्र व त्यातल्या त्यात आपल्या अहिल्यानगर जिल्ह्यात घुसखोर अधिक वाढल्याचे दिसून आहेत. नुकतेच पुण्यात स्वारगेट परिसरात एका बांगलादेशी घुसखोराकडे आधार कार्ड, पॅन कार्ड सह मतदान कार्ड व ड्रायव्हिंग लायसेन्स देखील सापडले आहे. मालेगाव मधे एका घुसखोरास नकली जन्म दाखला दिल्याप्रकरणी तहसीलदारावर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे, तसेच आपल्या अहिल्यानगर शहरात गेल्या काही महिन्यांपुर्वी जिहादी वृत्तीच्या सेतु चालकांमार्फत नकली शिक्के व बोगस आधारकार्ड बनवुन देण्याचा धक्का दायक प्रकार समोर आला होता. ज्याचा गुन्हा तोफखाना पोलिस स्टेशन येथे दाखल आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बांगलादेशी घुसखोरी करणाऱ्याविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले असताना नगर शहरात सेतू चालकांकडून असे गंभीर प्रकार घडत आहेत, ते थांबवा असे आ.जगताप यांनी म्हंटले आहे. यावेळी त्यांच्या समवेत सुरेश बनसोडे,सिद्धार्थ आढाव, सृजन भिंगारदिवे, ओंकार घोलप, गणेश कांबळे आदी उपस्थित होते.

# निंबळक जवळील रेल्वेचा जुना पत्री पुलाच्या जागी नवीन पुल उभारण्याचे काम अखेर पूर्ण

नगर – एप्रिल २०२४ पासून दौंड–मनमाड हा रेल्वे मार्ग सोलापूर विभागातून पुणे विभागात वर्ग केल्यापासून या मार्गावर अनेक चांगले बदल करण्यात येत असल्याचे दिसून येत आहेत. हा मार्ग संपूर्ण विद्युत करण्यात आलेला असून दुहेरीकरणाचे काम सुद्धा पूर्ण होण्याच्या मार्गावर असून या मार्गावरील रेल्वे आता पहिल्यापेक्षा जलद गतीने धावताना दिसून येत आहेत. याचाच एक भाग म्हणून निंबळक रेल्वेगेट क्रमांक ३० व निंबळक रेल्वे स्टेशन दरम्यान असलेला ब्रिटिश काळात उभारण्यात आलेला खूप जूना व ऐतिहासिक असलेला खारा नाल्यावरील संपूर्ण लोखंडी पूल अर्थात पत्री पूल म्हणून प्रसिद्ध असलेला पूल खूप जुनाट व धोकादायक झाल्यामुळे तो हटवून त्या ठिकाणी आधुनिक बनावटीचा सिंमेट काँक्रीटीचा मजबूत असा पूल उभारण्यात आला.





दौंड–मनमाड हा रेल्वे मार्ग सोलापूर विभागातून पुणे विभागात वर्ग केल्यापासून या मार्गावर दुहेरीकरणाचे काम सुद्धा पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे.

येथील काम करण्यासाठी ४ दिवस अगोदरच तयारी करून त्या ठिकाणी अत्याधुनिक ३ मोठे क्रेन, ३ जेसीबी, २ पोकलेन, २ डंपर, खडी, स्लीपर व रेल्वे रुळ, पाण्याचा एक ट्रॅक्टर, गॅस कटर, वेल्डिंग, २ कंटेनर, १ टेम्पो, जवळपास शंभर पेक्षा जास्त रेल्वेतील व ठेकेदाराकडिल कर्मचारी, रेल्वेतील अभियंते, विद्युत विभागातील कर्मचारी, प्रशासकीय अधिकारी, या ठिकाणी उपस्थित होते.

या कामासाठी मध्य रेल्वेकडून रविवार असल्यामुळे सकाळी ७ वाजल्यापासून ते दुपारी ३ पर्यंत मेगा ब्लॉक घेतला असल्याचे दिसून आले. काम पूर्ण झाल्यानंतर या मार्गावरील सर्व गाड्यांचे येणे–जाणे सुरळीत सुरु झाले.

निंबळक बायपास ने जाणाऱ्या येणाऱ्या अनेक लोकांनी आपली वाहने थांबवून मोठ–मोठ्या क्रेनच्या सहाय्याने सुरु असलेल्या पूल उभारणी कामाची कुतूहलाने पहाणी केली.

## अहिल्यानगर पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या कार्यकारणी निवडीची १२ फेब्रुवारीला बैठक

नगर – अहिल्यानगर जिल्हा व शहर पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्यावतीने नवीन कार्यकारी निवडीसाठी बैठक १२ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.३० वाजता शासकीय विश्रामगृह, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर येथे होणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष सुमेध गायकवाड यांनी दिली.


ही बैठक पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा लघुउद्योग महामंडळाचे उपाध्यक्ष जयदीप कवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. नुकतीच जिल्हा कार्यकारणी बरखास्त केल्याने या बैठकीत नवीन कार्यकारणीची निवड होणार आहे. तसेच पार्टीचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी आणि नागरिकांच्या विविध अडचणी समजून घेण्यासाठी बैठक होणार आहे.

तसेच यावेळी राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांची लघुउद्योग विकास महामंडळाच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर जिल्ह्याचेवतीने भव्य सत्कार करण्यात येणार आहे. तसेच १२ फेब्रुवारी जयदीप कवाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पंचशील विद्या मंदिर प्राथमिक शाळेचे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पार पडणार आहे.

या बैठकीला जिल्ह्यातील पार्टीच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष सुमेध गायकवाड व महिला जिल्हाध्यक्षा गौतमीताई भिंगारदिवे यांनी केले आहे.

## पोलीस दलाच्या जागेवरील अतिक्रमण व बांधकाम प्रकरणी संबंधित ठेकेदाराविरूद्ध पोलीसांनी फौजदारी गुन्हा दाखल करावा

नगर – सावेडी उपनगरातील तपोवन रस्त्यावरील पोलीस दलाच्या १२ एकर जागेच्या काही क्षेत्रात बांधकाम व्यावसायिकाने 'आरंभ' नावाची ६० फ्लॅटची एक भव्यदिव्य इमारत उभी केली व त्यालगतच ४ बंगले बांधून त्याची बेकायदेशीरपणे विक्री केल्याने संबंधित सदनिकाधारक यांना पोलीस दलाकडुन फ्लॅट खाली करण्याच्या नोटीसा दिल्याने सदनिकाधारकांमधे मोठी खळबळ उडाली. यामध्ये फसवणूक झालेले सदनिकाधारक यांनी पोलीसांकडे जाऊन फसवणूकीबद्दल रितसर लेखी फिर्याद देणे आवश्यक आहे. या प्रकरणात पोलीस देखील रितसर लेखी फिर्याद देऊ शकतात. कारण या प्रकरणी पोलीस दलाबरोबर सदनिकाधारक यांचीही बांधकाम व्यावसायिकाने फसवणूक केली आहे. पोलीस खात्यात गुन्हेगारांवर वचक राहीला नाही. चक्क पोलीस दलाच्या जागेवर दिवसाढवळ्या बांधकाम व्यावसायिकाने अतिक्रमण करून भलीमोठी भव्यदिव्य इमारत उभी केली.



ॲड. सुरेश लगड

आता क्षणाचाही विलंब न लावता पोलीसांनी स्वत:हुन फिर्यादी व्हावे. पोलीस फिर्यादी झाले नाही तर सदनिकाधारकांपैकी कुणीही एकाने पोलीस ठाण्यात जाऊन लेखी फिर्याद द्यावी, अशी माहिती ॲड. सुरेश लगड यांनी केली आहे.

## हिंदु धर्म टिकविण्यासाठी सर्वांनी संघटित होण्याची खरी गरज

### हभप सिनारे महाराज

नगर – किर्तन हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक असल्यामुळे धर्म, तत्त्वज्ञान, नीती आणि कला या चारही अंगाचे दर्शन कीर्तनातून होत असते. कीर्तनातून रामायण, महाभारत– मधील प्रसंगानुरुप भाषेचा सुयोग्य प्रयोग करीत हभप सिनारे मनोहर महाराज यांनी कीर्तनातून सांगितले. ते म्हणाले किर्तनकार हे समाज प्रबोधनाचे कार्य करीत आहे. हिंदू धर्म टिकवण्यासाठी आपण सर्वांनी संघटित होण्याची खरी गरज आहे, असे आवाहन त्यांनी केले.



शिलाविहार येथील श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या मंदिरात जन्मोत्सव साजरा होऊन हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याचे किर्तनाने झाली. (छाया – विजय मते)

**गोंदवलेकर महाराज जन्मोत्सवाची काल्याचे कीर्तनाने सांगता**

सावेडी उपनगरात शिलाविहार येथील श्री. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त भागवत कथा, अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने उत्साहात झाली. या प्रसंगी आमदार संग्राम जगताप, सुनिल त्र्यंबके, बाळासाहेब पवार, हभप रविंद्र महाराज आव्हाड, अनिल महाराज गरुड, कृष्णा महाराज रायकर, कृष्णा महाराज येळकांडे, माऊली गायकवाड, गहिनीनाथ नागरगोजे, केशव नागरगोजे, बाबु नागरगोजे, बाळासाहेब बडे आदी उपस्थित होते.

रविवारी सकाळी मंदिरात गोंदवलेकर महाराज यांचा जन्म सोहळा पार पडला. यावेळी महिलांनी पाळणा गीत म्हटले. हभप सुंदरदास रिंगणे यांनी राम नामाचे महत्त्व सांगून गोंदवलेकर महाराज यांच्या चारित्रग्रंथातील दाखले देत भाविकांना नामासाठी नाम घ्या, भगवंत तुमच्या जवळ येतील. महाराजांनी आपले संपूर्ण जीवन रामनामा मध्ये सार्थक केले, असे प्रवचनातून त्यांनी सांगितले.

काल्याचे कीर्तनातून सिनारे महाराजांनी काला किती महत्त्वाचा आहे. पौराणिक काळात भक्तीला मोक्षमार्गाचे महत्व किती होते. प्रत्येक सांप्रदाय हा ईश्वर भक्ती समाज प्रबोधनाच्या उद्देशाने प्रेरित असतो. वारकरी कीर्तनाचे महत्त्व सांगून सिनारे महाराजांनी समाज प्रबोधन केले.

काल्याचे किर्तन झाल्यावर महाप्रसादाचा लाभ भाविकांनी घेतला. सप्ताह सांगता यशस्वीतेसाठी सुदर्शन अडसुरे, विकास बोरुडे, नंदू आवारे, अमित गाडे, चैतन्य डहाळे, श्रीनाथ शेटे, प्रीतम सोनवणे, चैतन्य ढाकणे, लहू बडे, राम विधाते, पार्श्वनाथ औटी, महिला भगिनींनी परिश्रम घेतले. प्रसाद रिंगणे यांनी आभार मानले.

# सारडा महाविद्यालयात रंगली स्वादिष्ट पदार्थांची खवैय्येगिरी

**विद्यार्थ्यांच्या फूड फेस्टीव्हलमध्ये पारंपारिक व आधुनिक पदार्थांची रेलचेल**

नगर – चटकदार भेळ पाणीपुरी, बर्गर, मसाला स्वीट कॉर्न, कप केक, दाबेली, उलटा वडापाव, पापड भाजी अशा पहाता क्षणी तोंडाला पाणी सुटणाऱ्या पदार्थांबरोबर मराठमोळ्या कोथिंबीरीच्या वड्या, भाकरी ठेचा, पुरणपोळ्या व जोडीला मस्त मसाला ताक, कोल्ड कॉफी व गारेगार कुल्फी अशा स्वादिष्ट, चटकदार, व पौष्टिक पदार्थांची रेलचेल पेमराज सारडा महाविद्यालयात होती. निमित्त होते स्नेहसंमेलनातील फूड फेस्टिव्हल. सारडा महाविद्यालयात सध्या स्नेहसंमेल सुरु असून विविध उपक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये सर्वात आवडता उपक्रम दरवर्षी, मोठ्या उत्साहात राबविला जातो. या खवैय्येगिरीसाठी महाविद्यालयाच्या प्रांगणात सकाळ पासूनच फूड विद्यार्थ्यांची स्टॉल उभारणीसाठी लगबग सुरु होती. विद्यार्थी व विद्यार्थिनिंनी १६ विविध पदार्थांचे स्टॉल फूड फेस्टिव्हलमध्ये लावले होते. यामध्ये सहभागी झालेले विद्यार्थी स्वत: जागेवर पारंपारिक व आधुनिक पदार्थ तयार करत होते. उपस्थित पाहुणे, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी या स्वादिष्ट खवैय्येगिरीचा मनमुराद आस्वाद पदार्थ विकत घेत घेतला. हायजीन व स्वच्छतेची विशेष काळजी सर्व सहभागी विद्यार्थी घेत होते.



पेमराज सारडा महाविद्यालयात स्नेहसंमेलन निमित्त आयोजित फूड फेस्टीव्हलमध्ये विद्यार्थ्यांनी बनविलेल्या पदार्थांचा आस्वाद घेतांना प्रा.शिरीष मोडक, अजित बोरा, प्रा.ज्योती कुलकर्णी, प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावीत, अशोक असेरी, प्रा.शैलेश निकम आदी.

हिंदसेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांच्या हस्ते फीत कापून फूड फेस्टिव्हलचे उद्घाटन झाले. यावेळी महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, संचालिका व परिक्षक प्रा.ज्योती कुलकर्णी, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावीत, प्रबंधक अशोक असेरी, स्नेहसंमेलनाचे निमंत्रण प्रा.डॉ.शैलेश निकम, पर्यावेक्षक प्रा.राजू रिक्कल, फूड फेस्टिव्हल समितीचे सदस्य प्रा.अतुल कुलकर्णी, डॉ. किरणकुमार साळवे, लेफ्टनंट अंकुश आवारे, प्रा.गोपीनाथ होले, प्रा. अभिजित जोशी, प्रा. वैशाली सामल, कैलास करांडे, शैलेंद्र कुकडे व नंदू मगर आदींसह सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. सकाळी सुरु झालेले हे फूड फेस्टिव्हल दुपारपर्यंत सुरु होते.

प्रा.शिरीष मोडक म्हणाले, महाविद्यालयातील स्नेहसंमेलनाचे दिवस हे विद्यार्थ्यांसाठी आनंदाचे दिवस असतात. वर्षभर अभ्यास व परिक्षांचे टेन्शन काही दिवस दूर ठेवून विद्यार्थ्यांच्या कला–गुणांना वाव सारडा महाविद्यालय देत आहे. फूड फेस्टिव्हल सारखा उपक्रम हा या स्नेहसंमेलनाचे खास वैशिष्ट्य आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेल्या स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद घेतांना आनंद होत आहे.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित म्हणाल्या, फूड फेस्टिव्हल सारखा उपक्रमात सारडा महाविद्यालया मधील मुलींबरोबर मुलेही उत्साहात सहभागी होत असतात. मुलांनीही येथे अनेक पदार्थ बनवले आहेत. पदार्थ बनवण्यासाठी किती कष्ट घ्यावी लागतात याची जाणीवही आज विद्यार्थ्यांना झाली आहे.

यावेळी हिंद सेवा मंडळाचे सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष ॲड.अनंत फडणीस, माजी कार्याध्यक्ष ब्रिजलाल सारडा आदींनी या उपक्रमाचे कौतुक केले. प्रा.शीलेश निकम यांनी आभार मानले.

## कॉटेज कॉर्नर येथे हिंदू महिलांना मारहाण करणाऱ्या जिहादी लोकांवर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करा

### आ. संग्राम जगताप यांची मागणी

नगर – सिद्धार्थ नगर मधील हिंदू महिलांवर नागापूर कॉटेज कॉर्नर परिसरामध्ये जिहादी लोकांनी अमानुषपणे मारहाण केली. या घटनेतील इतर आरोपींना अटक करून सर्व आरोपींवर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी आ.संग्राम जगताप यांनी तोफखान्याच्या पोलिस निरीक्षकांकडे केली आहे.



कॉटेज कॉर्नर परिसरात मारहाण झालेल्या महिलांच्या प्रकृतीची सिव्हील हॉस्पिटल मध्ये जावून विचारपूस करताना आ.संग्राम जगताप व कार्यकर्ते. (छाया – लहू दळवी)

सिद्धार्थ नगर मधील हिंदू महिलांना झालेल्या मारहाणीच्या पार्श्वभूमीवर आ. संग्राम जगताप यांनी सिव्हिल हॉस्पिटल येथे जाऊन उपचार घेत असलेल्या महिलांची भेट घेत विचारपूस केली. मारहाण झालेल्या या महिला दिवसभर कष्ट करून उदरनिर्वाह करत असतात. काम केले तरच संध्याकाळची चूल पेटत असते, अशा हिंदू महिलांना त्यांची जात पाहून जिहादी लोकांकडून अमानुषपणे मारहाण करण्याचे काम केले आहे. हिंदू महिलांवर हात उचलणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा आ.जगताप यांनी दिला.

**'सिव्हील' मध्ये रुग्णांना चांगली आरोग्य सेवा द्या**

सिव्हील हॉस्पिटलच्या अनागोंदी कारभारामुळे लाल टाकी येथील ४० वर्षीय सनी बोरुडे याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. त्याला वेळेवर उपचार मिळाले नाही. आदल्या दिवशी घशाच्या त्रासाने हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले होते. मात्र त्याच्यावर कुठल्याही प्रकारे उपचार करण्यात आले नाही, त्याच्या नातेवाईकांशी कोणत्याही डॉक्टरांनी साधी चर्चाही देखील केली नाही. ही बाब तेथे उपस्थित काहींनी आ.जगताप यांच्या निदर्शनास आणून दिली.

रुग्णांवर उपचारादरम्यान दिरंगाई होते या ठिकाणी आधुनिक तंत्रज्ञानाचे मशिनरी असून देखील रुग्णांना त्याचा उपयोग होताना दिसत नाही. डॉक्टर अधिकारी कर्मचारी यांच्या ढिसाळ कारभारामुळे सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांचा मृत्यू होतो, त्याचबरोबर युवकांना देखील आपला जीव गमावा लागतो, ही बाब चांगली नाही सर्वसामान्य कुटुंबातील रुग्णांना चांगल्या दर्जाच्या आरोग्यसेवा मिळणे गरजेचे आहे. यासाठी प्रशासनाला उपाययोजना करण्याच्या सूचना यावेळी आ.जगताप यांनी दिल्या.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

